चक्रे फिरली
मानवत
नवे देखाव



# माणूस

तीस जून त्र्याहत्तर : पन्नास पैसे

श्री. ग. माजगावकर

३० जून १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

| | | |
|---|---|---|
| वार्षिक वर्गणी | पंचवीस रुपये | वर्ष : तेरावे । अंक : पाचवा |
| परदेशची वर्गणी | पासष्ट रुपये | |


## सप्रेम नमस्कार...

१६ जून, ७३

□ ९ जूनचा ' माणूस 'चा अंक वाचला. ' दामुतात्याचा बंधारा ' हा श्री. पंढरीनाथ चौधरी यांचा लेख वाचताना तळपायाची आग मस्तकाला गेली. सर्व-सामान्य जनतेच्या डोळ्यात धूळ फेकून जनकल्याणाच्या नावाखाली सत्ताधारी नेते आपल्या सत्तेचा उपयोग आपल्या आत्मस्वकीयांच्या स्वार्थासाठी कसा करून घेत असतात याची मासलेवाईक चालती बोलती उदाहरणे म्हणजे ' चिंचोटी बंधारा ' व शिरवली-उपसा-जलसिंचन योजना.' Ballot is Stronger than bullet या न्याय-नितीनुसार आपण आपल्या पुढाऱ्यांच्या मतपेटया भरत गेलो. पण स्वत:चीच पेटी भरून घेणारे असे स्वार्थी भ्रष्टा-चार जेव्हा बोकाळतात व दरिद्री गिरिजन व हरिजन यांच्यावर जेव्हा अमानुष अन्याय केले जातात, माणसाला माणूस म्हणून जगण्याची संधी दिली जात नाही, तेव्हा अशा वंचित बांध-वांनी सनदशीर भाषा सोडून क्रांति-कारक आंदोलनाची भाषा केली–कधी-मधी Ballot ऐवजी Bullet ची भाषा बोलली व त्यांच्या मनामध्ये उठणाऱ्या प्रक्षोभक डोंबाला वाट करून दिली तर त्याला हे स्वार्थी ' धनदांडगेश्वर 'च पर्यायाने कारणीभूत नाहीत काय ?

पंढरीनाथ चौधरी हे समाजवादी मतप्रणालीचे दिसतात. पण त्यांचा वृत्तांत जर खोटा असेल–निदान पक्ष-पाती, एकांगी, पूर्वग्रहदूषीत अथवा विपर्यस्त असेल तर संबंधितांनी आपला न्याय्य खुलासा जनसंमर्दासमोर मांडायला कच का खावी ?

प्रभाकर म्हात्रे यांचाही लेख विचार-प्रवर्तक वाटला राजकीय उलाढालीतील ' अंदरकी बात ' सांगणारा तो एक अभ्यासनीय लेख आहे. मुरब्बी राज-

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

कारणपटू साहित्यिकच। असा विषय इतक्या सहजरित्या हाताळू शकतो. स. का. पाटील जसे मुंबईचे अनभिषिक्त राजे होते तसेच जॉर्जसाहेब कामगारांचे कसे अनभिषिक्त (?) राजे झाले आहेत व त्यांनी आपल्या 'बंद'च्या मेघगर्जनेत राज्यभर दरारा निर्माण करणारा दारूगोळा कसा भरून ठेवला आहे हे लेखकाने उत्कृष्ट रीतीने शब्दांकित केले आहे. 'जॉर्ज बोले, मुंबई हाले, हे जॉर्जसाहेबांचे प्रस्थ मुंबईत जे माजत आहे व पोलिसांचे 'संस्थान' ही जे फर्नांडिससाहेबांचे 'मांडलीक' होऊ पाहत आहे त्याची रूपरेषा उजेडात आणल्याबद्दल लेखकांचे हार्दिक अभिनंदन !

एफ. कोरिया, मुंबई

¤ वसई तालुक्यात एक कारागीर सोसायटी स्थापन करण्याची बरेच दिवसांपूर्वी घोषणा झाली होती. बारा-बलुतेदारांपैकी, कुंभार, लोहार, सुतार, बुरूड व चांभार या पाच कारागिरांना या सोसायटीचे सभासद करून घेण्याचे ठरले. वसई तालुक्यातील हरिजन हे उत्तम प्रकारचे बुरुड काम करतात. परंतु आर्थिक हालाखीच्या परिस्थिती-मध्ये नवरा-बायकोने काम केले तरी त्यांना दोन वेळचे पोटाला मिळत नाही. बांबू मिळत नाही. ही मंडळी फार श्रद्धाळू. भाऊसाहेब, माईसाहेब सांगतात तेव्हा आपली गरिबी लवकरच हटेल या आशेने ही सर्व मंडळी या कारागीर सोसायटीमध्ये सामील झाली. जुलै १९७२ मध्ये या कारागीर लोकांकडून सोसायटीसाठी भाग भांडवल म्हणून बुरुडाकडून २३ रु. ५० पैसे, अधिक फॉर्म फी ३ रुपये, असे एकूण २६ रुपये ५० पैसे; सुतार, लोहार, कुंभार यांचेकडून ३६ रुपये अधिक ३ रुपये असे एकूण ३९ रुपये वसूल केले गेले व त्यांची सोसायटी स्थापन झाली. या कारागीर सहकारी संस्थेचे वसई तालुक्यात ५०० ते ६०० सभासद झाले आहेत. आता दहा-अकरा महिने होऊन गेले, पुढील महिन्यात वर्ष पूर्ण होईल. परंतु आर्थिक मदतीचा अजून पत्ता नाही. आज या सर्वच कारागिरांना अत्यंत हालाखीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. सोसायटी सुरू झाल्यावर सुखाचा घास खावयास मिळेल या आशेने मुलांच्या तोंडचा घास काढून भाग भांडवल भरण्यात आले. अनेकांनी तर घरातील भांडी विकून किंवा गहाण ठेऊन भाग भांडवल भरले. गहाण ठेवलेली भांडी व्याजापोटी मारवाड्याकडे आता जमा झाली आहेत. महाराष्ट्र राज्याच्या महसूलमंत्र्याच्या मतदार संघात ही अंधाधुंदी तर अन्य ठिकाणी काय असणार ?

सोसायटीसाठी भाग भांडवल भरल्यावर आपणास लवकरच आर्थिक मदत मिळेल या आशेने सभासद कॉंग्रेसवाल्यांकडे विचारणा करू लागले. हे कॉंग्रेसवालेसुद्धा महा हुशार. जो राष्ट्रीय दिन जवळ असेल त्या दिवशी तुमचे काम

होईल असे बेधडक ठोकून देऊ लागले. जुलै महिन्यात भाग भांडवल गोळा केल्याबरोबर १५ ऑगस्टला पैसे देऊ; १५ ऑगस्ट गेला, आता २६ जानेवारीला भाऊसाहेबांच्या हस्ते तुम्हाला आर्थिक मदत देण्याचा आम्ही कार्यक्रम आखतो, काळजी करू नका. ही टोलवा टोलवीची पद्धत. १५ ऑगस्ट प्रमाणेच २६ जानेवारी निघून जाते. मध्येच कोणीतरी तालुक्याच्या ठिकाणी येतो, रस्त्यात किंवा बी. डी. ओ. कचेरीत किंवा मामलेदार कचेरीत काँग्रेसचे नेते भेटतात. ते नवा वायदा करतात. भरघोस आश्वासन देतात. कोणी सभापतीला भेटतो. त्यांचाही शब्द १ मेला आता नक्की तुम्हाला आर्थिक मदत देतो! महाराष्ट्र दिनाकडे ही सर्व मंडळी डोळे लावून बसलेली होती! १ मे उगवतो व तसाच मावळतो परंतु आर्थिक मदत मिळत नाही. या गरीब कारागिरांची कोणी दाद घेत नाही. महसूल मंत्री ना.वर्तक, वसई तालुक्यात अनेक वेळा दौऱ्यावर आले परंतु त्यांच्या भोवती असलेल्या स्वार्थी काँग्रेसवाल्यांच्या, बड्या धनिकांच्या, व्यापाऱ्यांच्या आणि बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांच्या कोंडाळ्यामुळे त्यांना, त्यांच्या मतदार संघामधील कारागीर जनता कशा हालाखीच्या परिस्थितीत, आशाळभूतपणे येणाऱ्या राष्ट्रीय दिनाकडे आर्थिक मदतीसाठी दिनवाणी होऊन पाहत आहेत, हे दिसू शकले नाही. आर्थिक मदत घेऊन येणारा राष्ट्रीय दिन लवकरच येवो अशी सदिच्छा.

**पंढरीनाथ चौधरी, विरार**

●

---

मुक्काम औरंगाबाद

# मानवत : ताजा मृत्यू !

निळू दामले

दि. ७ जूनच्या 'अजिंठा'मधे बातमी. 'फौजदार परांजेची बदली. नागरिकात तीव्र नापसंती! ही बातमी परांजेनीच लिहिली तर नव्हती ना? ग्रामीण भागात ते लोकप्रिय होते असे म्हणून काँग्रेसवासी अजिंठ्याची बातमी म्हणते, की त्यांच्या काळात गुन्ह्याचे प्रमाण काहीही नव्हते. चोऱ्या वगैरे होत नव्हत्या.

ही बातमी मानवतच्या वार्ताहराने पाठवली. हेही काँग्रेसवासीच !

मानवतमधे खुनांची मालिका चालली असताना फौजदारसाहेब मानवतातच होते. ड्यूटी करत. ह्या बातमीदाराला काय म्हणायचे असेल ते तो म्हणो. पण फौजदार परांजेची बदली झाली. आणि काही दिवसातच ह्या खून मालिकेसंबंधातच श्री. बारहाते यांना अटक झाली.

ह्या योगायोग आहे काय? ही बदली पुरेशी बोलकी आहे.

दिनांक १८ रोजी मानवतचे माजी नगराध्यक्ष उत्तमराव बारहाते ह्यांना ३०२ कलमाखाली अटक करण्यात

आली आहे. त्यांच्याबरोबर त्यांची रखेली व इतर तिघांनाही अटक झाली आहे.

आता गुप्तधन प्रकरणातील रहस्य उघडकीला येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ' माणूस ' व ' मराठवाडा ' तल्या वार्तापत्रांमुळे ह्या पूर्ण प्रकरणाला खरी चालना मिळाली.

आता काय होते ते पहायचे.

ह्या खटला आता सुरू होईल.

पण अजूनही एक विनंती करावीशी वाटते.

८ जून रोजी एका २०–२५ वर्षे वयाच्या मुलीचा विहीरीत पडून मृत्यू झाला. अतिशय झटपट पंचनामा व चिरफाड आटोपून ही घटना बंद करून टाकण्यात आलेली आहे. ' आत्महत्या ' असे लेबल लावण्यात आले आहे. अशाच अनेक रहस्यमय आत्महत्या मानवतमध्ये झाल्या आहेत. गावातल्या लोकांना ही आत्महत्या आहे असे वाटत नाही. मुलीची ४ बोटे तोडण्यात आली होती व मानेवर जखम होती असे गावातले लोक बोलतात. पण अर्थातच दहशतीमुळे कोणी लेखी स्वरूपात आपले म्हणणे मांडावयास तयार नाही. त्या मुलीच्या प्रेतयात्रेमध्ये सामील झालेले लोक ' हा पाचवा खून आहे ' असे कुजबुजत होते. आजपर्यंतच्या ८ रहस्यमय मृत्यूंची व ४ खुनांची पार्श्वभूमी आणि लोकांच्या भावना लक्षात घेता पोलिसांनी गावातला संबंधित बातमीदार, काही प्रतिष्ठीत व्यक्ती अशांच्या समोर ते प्रेत ठेऊन मगच पंचनामा करायला हवा होता. पण तसे झालेले नाही. संशयाला जागा आहे असे मानवतमधे लोक बोलतात.

त्यासाठी पोलिसांनी त्या मुलीचे पुरलेले प्रेत उकरून त्वरीत चौकशी करावी व गावातल्या प्रतिष्ठींतांसमोर शहानिशा करावी. कदाचित मागील खुनांच्या संदर्भात काही महत्त्वाची माहिती व पुरावे ह्या ताज्या मृत्यू (-?) मधून मिळण्याची शक्यता आहे.

नवीन आलेल्या अधिकाऱ्यांनी अत्यंत चपळाईने अटक केली आहे. त्यांची ही तडफ टिकली तर खुनी सापडतील हे निश्चित.

पण खुनांच्या एकंदर पद्धतीवरून त्यात अनेक माणसे गुंतलेली आहेत, काही प्रतिष्ठीत मंडळीही गुंतलेली आहेत असे म्हणायला खूप वाव आहे. (पकडण्यात आलेले गृहस्थ माजी नगराध्यक्ष आहेत !) त्यामुळे अनेक लोकांकडून आता दबाव येण्याची शक्यता आहे. पुरावे नष्ट करण्याची धडपड आता सुरू होईल किंवा झाली असेल.

म्हणूनच कोर्टात खटला ज्यावेळी पूर्ण होईल त्यावेळी ' पुराव्या अभावी आरोपींना निर्दोष सोडण्यात आले आहे ' अशा प्रकारचा निकाल दिला जाणार नाही ह्याची पोलिसांनी काळजी घ्यावी. एकदा पक्का निर्णय झाला की पोलीस विलक्षण कार्यक्षमतेने वागतात हा आजवरचा अनुभव आहे. ज्या चपळाईने नवीन अधिकाऱ्यांनी हालचाली केल्या त्यावरून ते सिद्ध झाले आहे.

हीच चपळाई टिकावी, कार्यक्षमता टिकावी येवढीच इच्छा कोणीही प्रकट करील. विशेषत: घाबरलेले मानवतमधले लोक पोलिसांना धन्यवाद देतील. ●

## कृषिविद्यापीठ : धूळफेक !

कृषिविद्यापीठातल्या गुंडगिरीबाबतचा लेख 'माणूस'ने प्रसिद्ध केला. विद्यापीठातल्या अन्य गैरकारभाराबाबतही मी अन्य वृत्तपत्रांमधून लेख लिहिले होते.

सब घोडे बारा टक्के न्यायाने ह्या सर्वच लिखाणाला उत्तर देणारे एक निवेदन कृषिविद्यापीठाने सर्वच वृत्तपत्रांना पाठवले. सायक्लोस्टाईल करून अनेक प्रती काढण्यात आलेल्या ह्या निवेदनावर शिक्का होता 'गुप्त (Confidential)'

हे निवेदन म्हणजे सरळ सरळ धूळफेकीचे होते. 'सर्व आरोप खोटे आहेत' असे एका चिटोऱ्यावर लिहून पाठवले असते तर विद्यापीठाचे बरेच श्रम वाचले असते. कारण मी केलेल्या कोणत्याही आरोपाला सप्रमाण उत्तर त्या निवेदनात नाही. आम्ही यंव केले, त्यंव केले, आरोप करणारे संकुचित बुद्धीचे स्वार्थी आहेत, हीच वाक्ये सारखी आलटून पालटून वापरण्यात आली आहेत. सर्व प्रकारची थापेबाजी आणि फसवेगिरी ह्या निवेदनात करण्यात आली आहे.

हे निवेदन मिळाल्यावर मी मुद्दाम कुलगुरुंना भेटून आलो.

कुलगुरुंशी अनेक बाबींवर चर्चा झाली. मी केलेल्या कित्येक आरोपांबाबत जे कसे हतबल आहेत ते त्यांनी सांगितले. कित्येक बाबी 'केवळ त्यांच्या व माझ्यामधेच रहाव्यात' अशी विनंती केली. एक सज्जन म्हणून मी ती विनंती पाळत आहे. पण त्यामुळे एक घोळ आणखी लक्षात आला. विद्यापीठ सर्व आरोप नाकारते, वस्तुस्थिती आरोपांप्रमाणेच आहे हे सिद्ध होते. कुलगुरू आणि विद्यापीठाची तोंडे दोन टोकाला! मग जबाबदार कोणाला धरावे असा प्रश्न उभा राहतो.

माझ्या सर्वच लेखांना एकदम व मोघम उत्तर जरी विद्यापीठाने दिले असले तरी 'माणूस'मधल्या माझ्या लेखासंबंधातच मी विद्यापीठाचा समाचार घेऊ मागतो.

'स्टाफ'वर नेमणुका करताना गुणवत्ता असलेले 'ब्राह्मण' निवडले जात नाहीत ह्या केवळ योगायोग म्हणायचा काय ?

कारस्वाडकर, कुलकर्णी ह्या दोहोंच्या बाबतीत निश्चित असे आरोप मी केले होते. त्याला सप्रमाण उत्तर विद्यापीठ का देत नाही ? त्यांच्याऐवजी निवडण्यात आलेले लोक हे कोणत्या कारणास्तव चांगले आहेत ते क्रमवारपणे विद्यापीठ का सांगत नाही. ह्याबाबत कुलगुरू म्हणतात, 'मला माहीत नाही. ती जबाबदारी विविध निवड समित्यांची आहे.' विद्यापीठ निवेदन म्हणते, की निवड समितीतल्या आठ

जणांपैकी पाचजण ब्राह्मण होते. हा काय चावटपणा आहे ? निवड समितीत कोण होते हा प्रश्न नाही, निवडण्यात आलेल्यांची गुणवत्ता डावलली गेली की नाही हा महत्त्वाचा प्रश्न आहे. चांगल्या माणसांना डावलण्याचे पाप ब्राह्मणांनी केले तरी ते पापच ठरणार आहे; त्यांचीही सुटका होता कामा नये ! हीच माझी भूमिका आहे.

गुंडगिरीच्या संदर्भातही नावनिशीवार आरोप मी केले होते. प्रा. देशमुख दोषी आहेत की नाही ? त्यांचे नाव पोलिसांकडे चिथावणी देण्यासारख्या गंभीर गुन्ह्यासाठी नोंदण्यात आलेले आहे की नाही ? विद्यापीठ काहीही बोलत नाही. हा माणूस अजूनही कोणतीही कारवाई न होता विद्यापीठातच आहे. सत्याची चाड असेल तर विद्यापीठाने सप्रमाण खुलासा करावा.

विद्यापीठाने आणि पोलिसांनी विश्वास वाटेल असे वातावरण निर्माण करावे, म्हणजे ज्या ड्रायव्हरने आमदार पाटलांच्या भावाला रातोरात विद्यापीठाच्या जीपने गावाकडे पोचवले तो पुढे येऊन सर्व माहिती देईल. विद्यापीठाची तयारी आहे ?

विद्यापीठाला माझे अजूनही सांगणे आहे, की त्यांनी १९ मे चा ‘ माणूस ’ घ्यावा व त्यातल्या प्रत्येक आरोपाला प्रमाणासहित उत्तर द्यावे.

विद्यपीठातले वातावरण निकोप नाही. कोणी प्राध्यापक मला खुल्ले आम रस्त्यावर भेटायला तयार होत नाही. ‘ आम्ही तुम्हाला भेटलो हे कळले तरी आम्हाला त्रास होईल ’ असे ही मंडळी रात्रीच्या आळोखात एकाद्या तिऱ्हाईताच्या घरी सांगतात. रस्त्यात भेटले तर नमस्कारही करायला तयार होत नाहीत. ही भीति त्यांना का वाटावी ? विद्यापीठाचा कारभार जर खरोखरच स्वच्छ असेल तर त्यांच्यावर कोणताही दबाव येण्याचे काहीच कारण नाही. पण तसे होत नाही हे कशाचे द्योतक आहे ?

इतकी जाहीर चर्चा होऊनही ‘ नातेगोते ’ प्रकार संपलेला नाही. दलपत सोळुंके नावाच्या गृहस्थांची नेमणूक विद्यार्थी कल्याण विभागाचे तात्पुरते संचालक म्हणून करण्यात आली आहे. हे सोळुंके आहेत उपकुलसचिव वझरकर यांचे सख्खे मेव्हुणे. केवळ बी. एस्. सी. ! इतर त्यांच्यापेक्षा जास्त शिक्षण व योग्यतेची माणसे विद्यापीठात नव्हती काय ?

अनेक उदाहरणे देण्यासारखी आहेत.

विद्यापीठाने हे प्रकार करू नयेत आणि माझ्यासारख्यावर लिहिण्याची पाळी येऊ नये ही विनंती विद्यापीठाला करण्यापलिकडे माझ्या हाती दुसरे काही नाही !

● ● ●

# सो ल क ढी

## हॉट डॉग्ज विकणारा न्यायाधीश

सध्याचे केंद्रीय न्याय व कायदेमंत्री हरिभाऊ गोखले हे मंत्री होण्यापूर्वी मंत्री नव्हते; न्यायाधीश होते. न्यायाधीश असताना त्यांना नेमका काय पगार होता ते आपल्याला ठाऊक नाही; पण त्या पगारात त्यांचे भागत नव्हते एवढे मात्र खरे. त्यामुळे घरी सारखी कुरबुर चालायची. भांडणे व्हायची. भांडणांचा निकाल हरिभाऊंच्या विरूद्ध जायचा. मग हरिभाऊ कसनुसे व्हायचे. त्यामुळे न्यायदानात त्यांचे लक्ष लागेना. पगार वाढण्याची तर शक्यता नव्हती. तेव्हा त्या बाणेदार, कर्तव्यदक्ष पुरुषाने आपल्या पदाचा राजिनामा दिला. राजिनामा देताना प्रकृतीअस्वास्थ्याचे खरे कारण त्यांनी दिले नाही; मिळणाऱ्या पगारात आपले भागत नाही असे अधिक खरे कारण त्यांनी प्रामाणिकपणे दिले होते.

हरिभाऊ गोखल्यांच्या या राजिनाम्यावरून आणि विशेषतः ज्या कारणावरून त्यांनी राजिनामा दिला त्या कारणावरून केवढा गहजब झाला. अदूरदृष्टीच्या आणि आततायी वृत्तीच्या टीकाकारांनी, या हरिभाऊ गोखल्याला माज आला आहे, जेवताना हा तुपाऐवजी सोन्याची धार घेतो की काय कुणास ठाऊक, असे मोठे अनुदार उद्‌गार काढले. मी मात्र हरिभाऊ गोखल्यांना समजून घेण्याचा प्रयत्न केला: मला वाटले, गोखलेसाहेबांना पगार मोठा असेल तशी त्यांच्या खिशाला शंभर भोकेही असतील. कोणाच्या खिशाला किती भोके आहेत हे त्याचे त्यालाच कळते; इतरांना नाही कळत. आणि याची जाणीव इतरांनी दाखवली नाही तरी माझ्यासारख्या विवेकी माणसानें ती न दाखवणे, हे फारसे शोभादायक ठरले नसते. म्हणून हरिभाऊ गोखल्यांचे समर्थन मी चिकाटीने करत राहिलो. अखेर माझेच खरे होणार, या अविचल श्रद्धेने मी समाजात वावरत असतो.

या प्रकरणी तसेच झाले. लंडनच्या 'द टाईम्स' या वृत्तपत्रातील ही बातमी पाहा: न्यूयॉर्कमधील एक न्यायधीश, न्यायदानाचे काम करून उरलेल्या वेळात 'हॉट डॉग्ज' विकतो. ('हॉट डॉग्ज' या पदार्थाचे वर्णन मराठी भाषांतराने करता येत नाही, याबद्दल दिलगिर आहे. पण 'थालीपिठ' किंवा 'धिरडे' यांचे वर्णन इंग्रजी भाषेला झेपत नाही, याचे भान वाचक ठेवतील, असे मानतो.) या न्यायाधीश महाशयांना सालीना ३३००० (तेहेतीस हजार)

डॉलर्स पगार आहे; पण स्वारीला भलेमोठे कर्ज झाले आहे; आणि ते फेडताफेडता काही मालमत्ता गहाण पडली आहे.

कर्ज फेडण्यासाठी पैसे मिळवण्याचा मोठा नामी उपाय या गड्याने काढला यात शंका नाही. त्यात पंचाईत एकच व्हायची. न्यायमंदिरात त्याच्यासमोर खटले लढवणारे वकील कधी कधी हॉट डॉग्ज घ्यायला यायचे. हॉट डॉग्ज विकणाऱ्या न्यायमूर्तींना चटकन ओळखणे सोपे नाही. कारण विक्रेते बनताना ते डोळ्यावर काळा चष्मा चढवतात; रंगीबेरंगी, चित्रविचित्र कपडे घालतात. एखादा डोळस वकील मात्र त्यांना ओळखतो आणि हॉट डॉग्ज विकत घेताना दबल्या आवाजात म्हणतो : "न्यायाधीशमहाराज, दोन हॉट डॉग्ज देणार काय तेवढे ?" ●

## द लाँगेस्ट डे

६ जून १९४४. युरोपात घुसून हिटलरवर निकाली प्रतिहल्ला करणाऱ्या दोस्तांच्या विलक्षण मोहिमेची सुरवात या दिवशी झाली. ही मोहिम यशस्वी होईल असा विश्वास वाटत होता तरी ती फसण्याचीही शक्यता होती. कारण प्रतिहल्ला होणार याची कल्पना हिटलरला होती; परंतु तो केव्हा होईल आणि त्याचे स्वरूप काय असेल, याविषयी त्याला निश्चित अंदाज बांधता येत नव्हता. इकडे दोस्तांनी मोहिमेचा तपशील कसोशीने गुप्त ठेवला. त्यामुळे जर्मन युद्धयंत्रणा काहीशी गैरसावध असतानाच दोस्तांच्या फौजा तिच्यावर आदळल्या. आणखी काही महिन्यातच हिटलरची इतिश्री झाली.

दोस्तांचा प्रतिहल्ला होण्यापूर्वी नॉर्मंडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील प्रतिबंधक मोर्चांची पाहणी करताना फिल्ड-मार्शल रोमेलने आपल्या मदतनीसाला सांगितले होते: लँग, माझा असा अंदाज आहे की लवकरच एक दिवस दोस्तांच्या फौजा या किनाऱ्यावर उतरतील. तो दिवस आपल्या आयुष्यातील सर्वात दीर्घ दिवस असेल. कारण पहिल्या चोवीस तासात जर आपण त्यांना पुन्हा


# पुरंदरच्या बुरुजावरून

ब. मो. पुरंदरे

मूल्य : चार रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

समुद्रात फेकू शकलो तर युद्ध आपल्याला जिंकता येईल. तसे झाले नाही तर मात्र सगळे संपलेच, असे म्हणावे लागेल.

रोमेलचे म्हणणे अगदी अचूक होते, अशी इतिहासाची साक्ष आहे. जर्मनीच्या दुर्दैवाने, नॉर्मंडीविभागाची प्रतिकार-यंत्रणा ज्या हिकमती रोमेलच्या अखत्यारीत होती तो रोमेल, ६ जून १९४४ रोजी, आपल्या प्रिय पत्नीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी बर्लिनला गेला होता. स्वतः हिटलर झोपेची गोळी घेऊन गाढ झोपला होता. रणगाडादल उपयोगात आणण्यासाठी हिटलरची खास परवानगीची गरज होती; आणि हिटलरला झोपेतून उठवण्याची जोखीम पत्करायला कोणी तयार नव्हता.

तरीही दोस्तफौजांची काही कमी हानी झाली नाही. परंतु ही मोहिम इतकी विशाल आणि दीर्घसूत्री होती की तिच्यामुळे दोस्तांना युरोपच्या भूमिवर पाय रोखणे शक्य झाले. या मोहिमेची चित्तथरारक हकीगत कॉर्नेलियस रायन या लेखकाने 'द लाँगेस्ट डे' या पुस्तकात सांगितली आहे. हे पुस्तक तयार करताना रायनने 'ऑपरेशन ओव्हरलॉर्ड' (मोहिमेचे सांकेतिक नाव) या मोहिमेत भाग घेतलेल्या शेकडो व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या; हकीगती आणि कागदपत्र तर होतेच; आणि या सगळ्या साधनसामग्रीचा उपयोग करून त्या मोहिमेची शब्दरूप पुनर्निर्मिती केली. त्यामुळे रायनचे पुस्तक हा मोहिमेचा रुक्षकोरडा इतिहास नाही, तर घटना आणि व्यक्ती यांच्या परस्परसंबंधातून उभी झालेली ती एक नाट्यमंथर युद्धकहाणी आहे.

मूळ पुस्तकाची चित्रवत्ता जाणूनच, काही वर्षांपूर्वी, डॅरिल एफ्. झानुक यांनी 'द लाँगेस्ट डे' हा भव्य युद्धपट निर्माण केला. युद्ध मोहिमेचे प्रामाणिक चित्रण करणारा हा युद्धपट तेव्हा भरपूर गाजला. आता या चित्रपटाची आवृत्ती अधिक विशाल पडद्यावर सादर केली जात आहे. नव्या स्वरूपात, 'द लाँगेस्ट डे' हा चित्रपट अधिक देखणा, अधिक भव्य आणि अधिक परिणामकारक झाला आहे.

● ● ●

---

'भारतातील लोकशाहीचे उज्वल भवितव्य' या विषयावर नुकत्याच दिलेल्या एका व्याख्यानात इंदिरा गांधींवर टीका करताना मधु लिमये म्हणाले : इंदिरा गांधींनी अन्नधान्याच्या व्यापाराला स्पर्श केला, बाजारातून धान्य गायब. कोळशाला स्पर्श केला, कोळसा गायब. किंबहुना इंदिरा गांधींनी ज्या ज्या गोष्टींना हात लावला ती ती गोष्ट भारतातून नष्ट झाली.

उदाहरणार्थ, बांगला देशचे सुमारे एक कोटी निर्वासितसुद्धा !

---

# अस्वालीची हाक

## डॉ. नरेंद्र दाभोळकर

अस्वाली !

डहाणू तालुक्यातले एक अदिवासी खेडे. मुंबईपासून अदमासे दीडशे किलो मीटर अंतरावर.

अनादिकालापासून त्याच कथा आणि व्यथा घेऊन चालत आलेल्या भारतातील लक्षावधी खेड्यांपैकी एक.

दैन्य, दारिद्र्य, हलाखी सारे तसेच. अदमासे शंभर खोपटाचं गाव. वस्ती पंधराशेच्या आसपास. जगण्याचे साधन अर्थातच शेती. प्रत्येकाची सरासरी दोन ते तीन एकर जमीन. वर्षातून एकदा मान्सूनमध्ये भाताचे पीक घ्यावे. एकरातून निघणारे दोन अडीच क्विंटल धान्य चिक्कार समजावे आणि पुन्हा वर्षभर शेतीकडे बघण्याचा त्रास न घेता गुजराण करावी.

अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य या गोष्टी माणसाच्या जीवनाला योग्य त्या प्रकारे लागतात याची वार्ता या देशामध्ये बहुसंख्यांना बहुधा नसतेच. ज्या गोष्टी मिळणार नाहीतच त्याची माहिती असून उगाच वैताग कशाला !

अस्वाली याला अपवाद नाही. दिवसातून एकदाच भाताची कांजी प्यावी आणि सुखासमाधानाने पोट भरून (!) ढेकर द्यावा एवढेच या वारल्यांना माहित. धान्याचे काही इतर प्रकार जेवणात असतात, भाजीपाला वगैरे जेवणात असावा याचा यांना पत्ता नाही. लहान मुलांनाही दूध मिळत नाही, चहाशीही या लोकांचा संबंध आलेला नाही. ताडी हे एकमेव पेय यांच्या परिचयाचे.

पावसाळा हा वर्षातला सगळ्यात कठीण काळ. घरात तांदळाचा कण नसतो. नवीन पिकासाठी चार महिने थांबावे लागते. मग पुन्हा नेहमीचेच दुष्टचक्र. दुसऱ्याच्या शेतावर मजुरीला जाणे किंवा सावकाराला शरण जाणे परिणामही तसेच. पहिल्या पर्यायात स्वतःच्या शेतीकडे दुर्लक्ष होते. दुसऱ्या मुळे सावकाराचे पाश अधिकाधिक आवळले जातात. एकूण बुडत्याचा पाय खोलात. येथे निसर्ग म्हटले तर वरदहस्त ठरू शकतो. अन्यथा वैरीही बनू शकतो. पाऊस अतिशय. पूर्वेच्या बाजूला असलेल्या टेकाडावरून पाण्याचे ओहळ,

नाले, ओढे पावसाळ्यात तुडुंब भरून खळाळून वाहत असतात. जमिनीची जबरदस्त धूप होते. परंतु याच टेकड्यांच्यामुळे ढग अडवले जातात भरपूर वृष्टी होते आणि त्यामुळे जमिनीत पाण्याचे भरपूर साठे तयार होतात. जमिनही सुपीक आहे.

या वारल्यांचे जीवनच बदलावे याला उत्तर काय ? याची दोन उत्तरे नेहमी सांगितली जातात.

एक सर्वांगिण क्रांतीचे. हे सारेच्या सारे उध्वस्त होऊन जाऊद्या. उद्या काही अद्भूत सुखाची दुनिया उगवेल असे आश्वासन.

परंतु उद्याच्या क्रांतीच्या कोरड्या आशेवर आजची भडकलेली भूक भागत नाही आणि ती भूक बहुधा लाचार बनवते. थकलेल्या, लटपटणाऱ्या मनात आणि मनगटात क्रांतीचा जोश कोठून येणार ?

दुसरे उत्तर जमीन वाटप करून प्रत्येकाला उत्पादनाचे साधन मिळवून देण्याचे.

प्रत्यक्षात या वारल्यांच्यात काय घडले ? कूळ कायद्यांनी या आदिवासींना जमिनी मिळाल्या. त्यांच्या परिस्थितीत कसलाही फरक पडला नाहीच. उलट कूळ कायदा होण्याआधी वारल्यांच्याकडे होती त्याच्यापेक्षाही कमी जमीन बऱ्याचजणांच्याकडे आता आहे.

कोठे फसगत होत आहे ?

आपल्या देशातील गरिबीची समस्या गुंतागुंतीच्या असंख्य उभ्या आडव्या धाग्याच्या जाळ्यासारखी आहे. एकच ठोक उत्तर त्याला शोधणे चुकीचे आहे. स्वतःचीच फसवणूक करण्यासारखे आहे.

जमिनीवर मालकी सांगणारे प्रस्थापित हितसंबंध वारल्यांच्या हिताच्या आड जरूर येतात. परंतु आळस, दैवाधीनता, अज्ञान हेही प्रस्थापित तेवढेच जबरदस्त आहे. पुस्तकी पांडित्य कुंठीत करणारे आहे. या प्रस्थापिताविरूद्धची टक्करही भलतीच जोरदार घ्यावी लागते. कारण ती कायदे संमत करून जिंकता यणारी लढाई नव्हे

नेमके येथेच सारे हरले.. सत्तारूढ आणि विरोधी पक्षही.

क्रांतिकारक घोषणा आणि काही प्रमाणात कायदे केले की सत्तारूढ मंडळी मजेत.

भूमिमुक्ती आंदोलन करून स्वतःला अटक करून घेतले, यात विरोधी मंडळी खूष. चुकून कोठे जमीन मुक्त झालीच तर तिची पुढची जबाबदारी सरकावर टाकून नेतेजन पुढच्या आंदोलनासाठी रिकामे.

परिणाम एकच. वारल्याच्या कमरेची लंगोटी कायमच.

उत्पादनाच्या प्रक्रिये आधीच ज्यादेशात समान वाटपाचे नारे जोरजोरात लागले आहेत त्या ठिकाणी तर हे अधिकच विदारकपणे जाणवते.

आदिवासींनाच याचा दोष देणे कृतघ्नपणाचे होईल.

संधिवात झालेल्या रोग्याला पळायची गरज असताना तो मागेच राहील म्हणून बोल लावण्यात काय अर्थ ?

आजारी माणसाच्या बिछान्यापर्यंत आपण सर्वसोई पोहचवतो ना ? परिवर्तनाची हाक देखील आदिवासीच्या अंतःकरणापर्यंत आपल्याला त्याप्रमाणेच नेऊन पोचवावी लागेल.
☐

ही प्रक्रिया अर्थातच सुरुवातीला छोटी दिसेल परंतु तरीही अत्यंत महत्त्वाची ठरेल.

अस्वालीच्या वारली जीवनात डॉ. गोपाळराव राणे यांनी याची सुरुवात केली.

गेली तीस वर्षे या ना त्या स्वरुपाच्या परिवर्तनासाठी झीज सोसून धपडणारे हे व्यक्तिमत्व. राष्ट्र सेवादलात सुरुवातीला घडलेले. रचनात्मक पिंड असलेले.

स्वतःला दृष्टी मिळावी, समाजाचे पाय पुढे पडावेत हा हव्यास. या हव्यासामुळेच कीर्ति कॉलेजात संस्कृतची प्राध्यापकी करता करता शेतीतील प्रयोगाचा ध्यास त्यांनी घेतला. 'माणूस'च्या दूध अंकाचे कैफियतदार आबासाहेब करमरकर हे त्यांचे याबाबतीतील गुरू.

या देशातील परिवर्तन शेती हा कणा धरून उभारावे लागेल. शेतीमध्ये रिझल्ट लगेच मिळतात. येथील समाजाला भविष्य काळातील आश्वासनांपेक्षा आज काही रोकडे हवे असते हे विचार धरून डॉ. राणे जवळजवळ गेले तपभर शेतीत काम करत आहेत. अस्वाली हा त्यातला अलिकडच्या काळातला प्रयोग.

दोनवर्षापूर्वी बरोबर साठ विद्यार्थी घेऊन डॉ. राणे यांनी नाताळच्या सुट्टीत अस्वाली मध्ये पाऊल टाकले. आठ दिवस काम करून या चमूने सहा हजार चौरसफुटाचा एक बंधारा बांधला. या नवशिक्यांनी तसे काम चांगले केले. बंधारा अजून भक्कमपणे उभा आहे. ओढयामुळे होणारी जमिनीची धूप थांबण्यास त्याचा उत्तम उपयोग झाला. पुढच्या उपक्रमासाठी काही पार्श्वभूमी या मंडळींना मिळाली.

यापुढचा कार्यक्रम म्हणून या मंडळींनी प्रथम एका विहिराचा कार्यक्रम हाती घेतला. २५ फूट व्यासाची एक विहीर बांधून काढली. सुमारे ५० जणांच्या पंधरा दिवसाच्या श्रमदानातून. तशी या भागात पावसाची कमतरता नाही पण बऱ्याचवेळेस हा भरपूर पाऊस लावणीच्या वेळेसच नेमका दडी मारतो. सध्यातर नवी खते वापरावयाची ठरवली तर हुकमी पाणी हवे असते. त्यामुळे नक्षत्रावरच अवलंबून असलेल्या या वारल्यांची फार पंचाईत होते. तेव्हा हुकमी पाण्यासाठी हव्यात सामुदायिक बागायती विहिरी. सुदैवाने या भागात पाणी लागतेही लवकर. अवघ्या दहा फुटांवर. यांच्या अंगच्या पाण्याला जमिनीमधले पाणी भेटले. आणखी तीन फूट खोल गेल्यावर तर विहीर तुडुंब पाण्याने भरली.

यानंतर डॉ. राणेंनी हरित क्रांतीला हात घातला. नवे तंत्र आणि नवे मंत्र वापरले. पहिला प्रयोग केला चार वारल्यांच्या अवघ्या ३२·५ गुंठ्यामधे.

अतिशय काळजीपूर्वक प्रयोगाची आखणी झाली. पहिल्या प्रयोगात अपयश आले तर ते परवडणारे नव्हते कारण या वारल्यांचा ना स्वतःवर विश्वास ना दुसऱ्यांच्यावरही. शेकडो वर्षे गुलामी मनाचे जीणे जगलेल्यांच्याकडून आणखी कसली वेगळी अपेक्षा करणार? यासाठी या प्रयोगात डॉक्टरांनी अखंड सावधानता बाळगली. बारा जूनला भात पेरणी झाल्यापासून रोप लागवड फवारणी, कोळपणी, खतपुरवठा या गोष्टी शेतकऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या बरोबर डॉ राण्यांच्या मार्गदर्शनाखाली अचूकपणे केल्या. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी सहा विद्यार्थ्यांची एक तुकडी आपला मुक्काम अस्वालीला ठोकून येत असे. दोन दिवसाचा सत्तर विद्यार्थ्यांचा एक कॅम्पही तेथे झाला.

चारी शेतकऱ्यांचा एकोपा, विद्यार्थ्यांची धडपड, विहिरीमुळे हुकमी पाणीपुरवठा, किर्लोस्कर ऑईल इंजिन्सची देणगी, योग्यवेळी महाराष्ट्र कृषी औद्योगिक महामंडळाकडून मिळालेले १५० किलो खत या साऱ्यांमुळे उपक्रमाला घवघवीत यश मिळाले. ३१·५ गुंठ्यात १७८८ किलो भात निघाला. दर एकरी २५० किलो भाताचे पीक बघण्याची सवय असलेल्या आदिवासी एकरी मिळालेल्या या २२२६ किलो पिकाने मोहोरून गेला.

या यशाचा त्या भागात तत्काळ परिणाम झाला. ऑक्टोबर १९७१ ते १९ मे १९७२ पर्यंत आणखी सहा विहिरी सुमारे अडीचशे विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वेळी श्रमदान करून खोदण्यात आदिवासींनाच पुढाकार घ्यावयास लावून, पहिल्यापेक्षा तिप्पट क्षेत्रात भात उत्पादनाचा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सहकार्याने डॉ. राणे यांनी हातात घेतला.

हे सर्व प्रयोग करत असताना युवक शक्ती, सद्यःस्थिती आणि समाज परिवर्तन यांच्या काही ठाम कल्पना त्यामागे होत्या—

१ : कुठलेच काम केवळ प्रतिकात्मक नसावे. काही भरीव हातात लागावयास हवे.

२ : संपत्ती निर्मितीचाही प्रश्न तीव्रतेने जाणवणाऱ्या या देशात परिवर्तनाचे काम हे उत्पादनभिमुख असणे अधिक श्रेयस्कर.

३ : कार्यक्षेत्र समाजातला तळाचा वर्ग हे असावे.

४ : काम हे भांडवली गुंतवणुकी सारखे असावे. ज्याच्या आधारावर पुढील प्रक्रियेला, समाजपरिवर्तनाला चालना मिळावी.

५ : कामाची दृष्टी विज्ञाननिष्ठ आणि शास्त्रीय हवी.

६ : काम करणाऱ्यांची, विद्यार्थ्यांची, शिक्षकाची, सामाजिक जाणीव विकसित व्हावी. समाजातील पिळल्या जाणाऱ्या वर्गाची त्यांना जाण यावी. त्याचे ज्ञान व्हावे. विचारवंत आणि श्रमवंत यांच्यातील दरी सांधली जावी. पुस्तकी पानात आणि वर्गाच्या चौकटीत बंदिस्त झालेले त्यांचे ज्ञान या दरिद्री भुकेकंगाल देशाच्या प्रश्नांना सामोरे जावे.

डॉ. राणे यांनी आपल्या उपक्रमात या सगळ्या बाजूंनी यशस्वीपणे स्पर्श केला आहे.

पहिल्या यशानंतर अस्वालीला पुन्हा एक शिबीर झाले. २५ मे ते ३ जून १९७२. १५ आदिवासी आणि १५ विद्यार्थी यांचे एकात्रित प्रयत्न. या कॅंपमध्ये त्यांनी पहिलीच विहिर आणखी खोदली. शेती भिजवली. गादी-वाफे तयार केले. मुंबईत पावसाचे काहीही चिन्ह नसताना १ जूनला पेरण्या पुऱ्या केल्या. २७ जूनला पाऊस भरमसाठ चालू झाला. लोकांना पेरण्या करताच आल्या नाहीत. केल्या त्यांच्या वाहून गेल्या. दहा दिवस आधी गादी-वाफ्याच्या पद्धतीने केलेल्या पेरण्या वाचल्या. नव्वद गुंठ्यात यावेळी जया व आय. आर. आठ (I· R. 8) याची पेरणी केली. आदिवासी स्वावलंबी बनावयास हवेत ही मूळ इच्छा म्हणून मागच्या वर्षी विद्यार्थ्यांनी प्रामुख्याने काम केले होते तर यंदा आदिवासींनीच सर्व काम केले. विद्यार्थ्यांच्या देखरेखी-खाली आदिवासींनी जपानी पद्धतीची भात लागवड चांगली केली. ऑगस्टमध्ये दुष्काळाची चाहूल लागली. सप्टेंबरात पाऊस अजिबात पळाला. विहिरीच्या पाण्याने ७० गुंठ्यांमधले पीक वाचवता आले. पाऊस मनाप्रमाणे पडूनही अवघे ५-७ पोती धान्य मिळणाऱ्या शेतकऱ्याला या दुष्काळातही १७–१८ पोती धान्य मिळाले. सरासरी एकरी पिक २१००' किलो आले. या कामाचे तपशिलवार हिशोब ठेवला गेला. कामाचे मूल्यमापन काटेकोरपणे केले गेले. लेव्हीच्या दराने हिशोब केला गेला.

याचा परिणाम म्हणून विद्यापीठाने या आदिवासीं भागात पंचवीस बागा-यती विहिरी खणून देण्याचे ठरवले. रौप्यमहोत्सवी वर्षाची ही भर डॉ. राणेंच्या अध्यक्षतेखालीच समिती नेमली. डिसेंबरमध्ये चालू होणारे हे काम दुष्काळामुळे ऑक्टोबरमध्येच चालू करण्यात आले डहाणू तालुक्यात अस्वाली, पळवी बोर्डी, घोलवड, कैनाड, सायवन, बापूगाव, दामखिड, शहापूर तालुक्यातले चरीव अशा एकूण २५ विहिरी खणण्यात आल्या. सगळ्या विहिरींना पाणी लागले. तीस कॉलेजच्या सुमारे हजार विद्यार्थ्यांनी यात भाग घेतला. यातील ७५ टक्के खर्चाचा भाग सरकार देते. पंचवीस टक्के मुंबई विद्यापीठाचे. विद्यार्थ्यांचा परीक्षेच्या काळात व इतर वेळाही स्थानिक लोकांना यामुळे मजूरी मिळाली. प्रत्येक विहिराचा खर्च पंपसेटसह अंदाजे १६०० रु. आला. अस्वालीच्या नमुन्याप्रमाणे येथेही काम उभे राहिल.

लोकांच्या सक्रिय सहभागाबद्दल अशा उपक्रमामध्ये नेहमीच ओरड केली जाते. या ठिकाणी अनुभव वेगळा आहे. लोकांनी सर्वच कामात अहमहमिकेने भाग घ्यावयास सुरुवात केली. तेथील लोकांनी पुढाकार घेऊन आदिवासी शेतकरी मंडळ स्थापन केले. त्यात समित्या तीन. एक शेती, दुसरी शिक्षण, तिसरी उद्योगधंदे.

एकाही आदिवासीची जमीन लाग-

वडीखाली येण्यावाचून राहू नये, त्यातही किमान दहा गुंठे तरी नवीन बियाणाखाली यावी यासाठी धडपड चालू आहे. हे होण्यासाठी पालेमोड पद्धतीलाही उत्तर शोधावे लागेल. पावसाळ्यातल्या वा इतर अडीअडणीच्या वेळेस १ पोते धान्य द्यावयाचे आणि नंतर त्याऐवजी चार पोती घ्यावयाचे असा हा सावकारी प्रकार. गेल्या वर्षी तर पाऊस पडला नव्हता त्यामुळे परिस्थिती आणखीनच भयानक होती. तेव्हा यापासून वारल्यांना वाचविण्यासाठी मुंबईत धान्य गोळा करण्यात आले. यामध्ये मदत आहे पण भीक नाही. पालेमोड पद्धत यामुळे मोडीत निघेल. शेतकरी शेतात पीक आल्यावर पोत्याला पोते धान्य खुशीने कोणत्याही कारणासाठी देईल.

दैववादी आदिवासी विज्ञानवादी झाला. नक्षत्रवादी वारली कर्तृत्ववादी झाला. जगातल्या शेतीतल्या आधुनिक प्रयोगाबरोबर या तळातल्या अडाण्याचा संबंध जोडला गेला. त्याच्यात त्यामुळे आत्मविश्वास दुणावला, इच्छाशक्ती प्रबळ झाली.

स्वतःच्या प्रवृत्तीशी आणि परिस्थितीशी झुंजण्याची जीद्द आली. ही क्रांतीची चाहूल नव्हे का ?

सरकारने भाराभर कायदेकरून फायदा नाही. सरकार आणि विरोधी पक्ष त्या कायद्याच्या अंमलबजावणीबाबत, त्या सोयी प्रत्यक्षात उपलब्ध करून देण्याबद्दल सारखेच उदासीन आहेत. निष्क्रियतेबद्दल सारखेच बदनाम आहेत.

आजचे शिक्षण हेही अनुभव शून्य आणि बांडगुळासारखे झाले आहे. विकासकार्यात हवी आहेत रसरसणारी उपक्रमशील माणसे. त्यांना वनस्पतीशास्त्र, शेती, अर्थशास्त्र, समाजशास्त्र थोडे पदार्थ विज्ञान आणि रसायन, ग्रामीण कायदे यासर्वांचे प्रत्यक्ष अनुभवी ज्ञान असण्याची गरज आहे.

डॉ. गोपाळराव राणे यांच्या सारखी काही रसरसलेली, सळसळत्या उत्साहाची माणसे युवकांना घेऊन उभी राहिली आणि आदिवासी अस्वालीत एक नवीन अध्याय उघडला गेला. हे आवाहन आणि आव्हान अशाच युयुत्सु वृत्तीतून सर्व दूर पोचले तर क्रांतीच्या पाऊलखुणा नक्की आढळू शकतील.

• • •


# फिडेल, चे आणि क्रांती

**अरुण साधू । मूल्य : सात रुपये । राजहंस प्रकाशन**

उत्तरप्रदेशच्या निमित्ताने

# राष्ट्रपती राजवटीचा गैरवापर

वा. दा. रानडे

भारतातील सर्वात मोठे राज्य असलेल्या आणि भारताला तीन पंतप्रधान पुरविणाऱ्या उत्तरप्रदेशात पाच वर्षात तिसऱ्यांदा राष्ट्रपतींची राजवट लादली जाते आणि तीही सत्तारूढ पक्ष बहुमतात असताना. यात त्या पक्षाची आणि त्या पक्षाच्या नेतृत्वाची उघड-उघड नामुष्की आहे. त्याच्या नालायकपणाचे ते गमक आहे. पण काही महिन्यांनी येणाऱ्या निवडणुकांवर दृष्टी ठेवून हा मार्ग त्या पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने पत्करला आहे. आपले राजकीय उद्देश साधण्यासाठी राष्ट्रपतींच्या राजवटीसारख्या घटनात्मक तरतुदी राबविणे हा केवळ अनिष्ट पायंडा आहे. एवढेच नव्हे; तर लोकशाही मूल्ये व संकेत पायदळी तुडविणे आहे. पण निवडणुका जिंकणे आणि सत्ता मिळविणे हेच आजच्या सत्तारूढ पक्षाचे आज सर्वश्रेष्ठ मूल्य झालेले आहे. त्यासाठी इतर मूल्ये पायदळी तुडविण्यात त्या पक्षास कसलीही खंत वाटत नाही.

पोलिसांचे बंड ही राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गंभीर घटना. त्यातून उद्‌भवलेल्या परिस्थितीची नैतिक जबाबदारी स्वीकारण्यासाठी आपण राजिनामा दिला असे मुख्यमंत्री कमलापती त्रिपाठींनी राजिनाम्याच्या पत्रात म्हटले आहे, त्यांची ही नैतिक जबाबदारीची जाणीव हा केवळ एक मुखवटा आहे. निवडणुकीत लोकांपुढे उजळ माथ्याने येता यावे म्हणून त्यांनी हा मुखवटा धारण केला आहे. तोही स्वेच्छेने नव्हे; तर केंद्रीय नेतृत्वाने इंदिरा गांधींनी त्यांना हा मुखवटा धारण करण्यास भाग पाडले म्हणून. पोलिस बंडाबद्दलची नैतिक जबाबदारी कमलापतींना खरोखर मनापासून घ्यावयाची असती तर बंड घडले त्याच दिवशी राजिनामा देण्याची तयारी त्यांनी दर्शवावयास हवी होती; पण तसे त्यांनी केले नाही. पंतप्रधानांनी भाग पाडल्यानंतरच त्यांनी राजिनामा दिला.

या प्रश्नावर कमलापतींचे सुरुवाती-

पासूनचे पवित्रे लक्षात घेण्यासारखे आहेत. पोलिसांचे बंड काही अचानक उद्‌भवले नाही. गेले दोनचार महिने सूचक घटना घडत होत्या. गुप्तहेर खात्याकडून केंद्र सरकारला मिळालेल्या माहितीनुसार पंतप्रधानांनी कमलापतींना त्याबाबत इशाराही दिला होता पण त्यांनी काहीच उपाययोजना केली नाही. राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा निर्णय घेण्यासाठी उत्तर प्रदेश मंत्रिमंडळाची बैठक १० जूनला दिल्लीस झाली. त्यानंतर एका वार्ताहराने कमलापती त्रिपाठींना प्रश्न विचारला, 'उत्तर प्रदेशातील घटनात्मक यंत्रणा कोलमडली आहे असे तुम्हाला वाटते का ?' त्रिपाठींनी उत्तर दिले, 'यंत्रणा चांगली व मजबूत आहे.' मंत्रिमंडळाने परिस्थिती समर्थपणे हाताळली आहे असा दावा त्रिपाठी राजिनामा देण्याच्या दिवसापर्यंत करीत होते. 'मी राजिनामा देणार नाही' असेही ते म्हणाले होते. नैतिक जबाबदारी आणि त्यासाठी राजिनामा हा पवित्रा त्यांना पंतप्रधानांनी घेणे भाग पाडले.

पोलिसांचे बंड झाले नसते तर केंद्र सरकारने त्रिपाठी मंत्रिमंडळाला निवडणुका होईपर्यंत अधिकारावर राहू दिले असते. त्रिपाठी सरकारच्या कार्यक्षमतेबद्दल इंदिरा गांधींचा भ्रमनिरास दीड वर्षांपूर्वीच झाला होता. मुख्यमंत्री अकार्यक्षम आहेत, राज्यातील कॉंग्रेसची प्रतिमा खालावली आहे याची त्यांना जाणीव झाली होती. मुख्यमंत्री बदलण्याचा विचारही त्यांच्या मनात आलेला होता; पण कारभार खालावला असला तरी पक्षात त्रिपाठींच्या मागे बहुमत असल्यामुळे त्यावेळी या प्रश्नाला त्यांनी प्राधान्य दिले नाही. गेल्या वर्षात गटबाजी, कारभारातील शैथिल्य, सार्वत्रिक पातळीवर भ्रष्टाचार या गोष्टी एवढ्या थराला गेल्या की, आता परिणामकारक उपाय योजल्याशिवाय गत्यंतर नाही असे पंतप्रधानांना वाटू लागले. कमलापतींचे पक्षातील वजन लक्षात घेऊन त्यांनी या बाबतीतला निर्णय लांबणीवर टाकला होता. पण पोलीस बंडानंतर मात्र आता विलंब करणे धोक्याचे आहे अशी पंतप्रधानांची खात्री झाली.

पोलीस बंडाबद्दलची नैतिक जबाबदारी त्रिपाठींनी मान्य केली; पण राज्यकारभाराच्या सर्वच क्षेत्रात मंत्रिमंडळाला जे अपयश आले होते त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारण्यास मात्र त्रिपाठी आणि त्यांचे सहकारी पुढे आले नाहीत. या पापांबद्दल म्हणजेच कारभारातील अपयशांबद्दल तुम्ही कोणत्या तरी स्वरुपात प्रायश्चित्त घेतले पाहिजे असे इंदिरा गांधींनी त्रिपाठींना अनेकदा सुचविले. 'तुम्ही मुख्यमंत्रिपद सोडा' असे त्यांनी त्रिपाठींना स्पष्ट सांगितले नाही; पण मंत्रिमंडळात मोठे फेरबदल करण्याची सूचना केली होती. राज्य वीजमंडळ इंजिनिअरांच्या संपात तडजोड घडवून आणण्यासाठी इंदिरा गांधींना स्वतः मध्यस्थी करणे भाग पडले. त्रिपाठींनी हा प्रश्न ज्या पद्धतीने हाताळला ते पाहता त्याच वेळी मुख्यमंत्री बदलण्याचा विचार केंद्रीय नेत्यांनी

गंभीरपणे केला होता, पण तो पुढे ढकलला.

राज्यकारभारातील गोंधळ दिवसेंदिवस वाढत चालला असताही त्रिपाठींना इंदिरा गांधींनी अधिकारावर राहू दिले याचे कारण, त्यांच्या जागी पक्षाला मान्य होईल असा कोण नेता आणता येईल, याबद्दल त्यांचा निर्णय ठरत नव्हता. दुसरे कारण असे, की मध्येच मुख्यमंत्री बदलल्याने आगामी निवडणुकीतील काँग्रेसच्या यशावर तर प्रतिकूल परिणाम होणार नाही ना, अशी भीति त्यांना मनातून वाटत होती. राज्यांच्या मुख्यमंत्र्यांपैकी पंतप्रधानांनी काही मुख्यमंत्री राज्यावर लादले होते; पण त्रिपाठी त्यापैकी नव्हते. त्यामुळे केंद्रीय दडपणापुढे ते बिनविरोध मान तुकवितील असा संभव नव्हता. केंद्रीय दळणवळणमंत्री बहुगुणा सोडले; तर राज्यात भक्कम राजकीय पाया असलेला जिल्हा व तालुका पातळीवरील पक्षयंत्रणेशी परिचित असलेला आणि पक्षातील बऱ्याच मोठ्या गटाचा पाठिंबा असलेला त्रिपाठींशिवाय दुसरा नेता राज्यात नव्हता. अशा परिस्थितीत त्रिपाठींच्या अनुयायांकडून हार्दिक सहकार्याचे आश्वासन मिळाल्याशिवाय निवडणुकीपूर्वी त्यांना मुख्यमंत्रिपदावरून दूर करण्याचा धोका पत्करण्याची इंदिरा गांधींची तयारी नव्हती.

इंदिरा गांधींनी दिल्लीला त्रिपाठींशी दीर्घकाळ केलेल्या वाटाघाटीत आगामी निवडणुका हाच मुख्य विषय होता. त्रिपाठींनी राजिनामा दिल्यानंतर निवडणूक मोहिमेची जबाबदारी पत्करण्यास ते कितपत तयार आहेत हे पंतप्रधानांना जाणून घ्यावयाचे होते. मंत्रिमंडळाच्या राजिनाम्यानंतर राज्यात कोणत्या शक्ती व गट काय हालचाली करतील हे मी सांगू शकत नाही. काँग्रेस विजयी होण्यासाठी निवडणूक मोहिमेची पूर्ण जबाबदारी इंदिरा गांधींनाच स्वीकारावी लागेल, असे त्रिपाठींनी सांगितले. राज्यात राष्ट्रपतींची राजवट काही महिने लागू करावी, राजकीय गटांच्या दडपणाचे वातावरण निवळून स्थैर्य निर्माण झाले, की राष्ट्रपती राजवट मागे घ्यावी. पंतप्रधानांना नको असलेले मंत्री वगळून त्रिपाठींनी नवे मंत्रिमंडळ बनवावे असा हा पर्याय इंदिरा गांधींनी अखेर निवडला. पाच मंत्र्यांना वगळण्याची पंतप्रधानांची सूचना त्रिपाठींनी मान्य केली असती; तर राष्ट्रपतींची राजवट टळली असती, पण ज्या मंत्र्यांविरुद्ध माझी काही तक्रार नाही त्यांना 'जा' असे मी सांगू शकत नाही. जायचे तर सर्वच जातील अशी भूमिका त्रिपाठींनी शेवटपर्यंत घेतली. अशा परिस्थितीत इंदिरा गांधींना नको असलेल्या मंत्र्यांनी आपण होऊन राजिनामे देणे हाच राष्ट्रपतींची राजवट टाळण्याचा एक मार्ग होता. पण त्यांनी राजिनामे दिले नाहीत. राष्ट्रपती राजवटीला त्यांचाही विरोध होता. पण त्रिपाठींप्रमाणेच राजिनामे द्यायचे तर सर्व मंत्र्यांनी द्यावेत अशी भूमिका त्यांनी घेतली. त्यामुळे राष्ट्राध्यक्ष राजवटीशिवाय दुसरा मार्ग राहिला नाही.

उत्तरप्रदेशात राष्ट्रपतींची राजवट लागू केली असली तरी विधानसभा बरखास्त करण्यात आलेली नसून ती स्थगित ठेवली आहे. निवडणुकीपूर्वी काही काळ राज्यात पुन्हा काँग्रेस मंत्रिमंडळ अधिकारावर आणावे हा यामागील उद्देश उघड आहे. राष्ट्रपती राजवट दोन महिन्यांपुरतीच राहील असा अंदाज प्रथम करण्यात आला; पण ती अधिक लांबण्याचाही संभव आहे. दोन महिन्यांनी मंत्रिमंडळाची पुनर्घटना करणे सोपे जाईल असे त्रिपाठींना वाटत नाही. आपण स्वत: निवडलेले नव्हे तर केंद्राने लादलेले मंत्री घेऊन नवे मंत्रिमडळ बनविण्यास ते फारसे उत्सुक नाहीत. निवडणुकीवर दृष्टी ठेवूनच राष्ट्रपतींची राजवट लादली असल्याने सत्तारूढ पक्षास अनुकूल परिस्थिती निर्माण होईपर्यंत ती उठविली जाण्याची शक्यता नाही. पाऊस चांगला होऊन पीक चांगले येणे, सरकारी कारभारयंत्रणेवर लोकांचा पुन्हा विश्वास बसणे, पक्षाची पुनर्घटना, आर्थिक परिस्थिती सुधारणे या साऱ्या गोष्टी फेब्रुवारीपर्यंत घडल्या; तर निवडणुका त्यावेळी होतील. तोपर्यंत घडल्या नाहीत तर राष्ट्रपती राजवट लांबण्याचा आणि निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याचा संभव आहे.

राजकारणातून निवृत्त होण्याचा आपला विचार नाही हे त्रिपाठींनी स्पष्ट केले आहे. याचा अर्थ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा त्यांचा प्रयत्न राहीलच. इंदिरा गांधी त्यांना काँग्रेसचे अध्यक्षपद किंवा केंद्रीय मंत्रिपद देऊ करतील; पण तेवढ्याने त्यांचे समाधान होईल की नाही याबद्दल आताच अंदाज बांधणे कठीण आहे. निवडणुकांच्या वेळी आपले मंत्रिमंडळ अधिकारावर असणे सत्तारूढ पक्षाला फायद्याचे होईल हे उघड आहे. घटनात्मक पेचप्रसंग नसताना आणि विधानसभेत पक्षाचे बहुमत कायम असताना राज्यावर राष्ट्रपती राजवट लादल्याने जनतेत काँग्रेसची प्रतिमा डागाळली आहे. येत्या सहा महिन्यांत ही प्रतिमा कितपत उजळेल याची शंका आहे; पण त्रिपाठींना अधिकारावर ठेवले असते तर प्रतिमा आणखी डागाळली असती. त्यापेक्षा राष्ट्रपती राजवटीच्या काळात काही धडाकेबद उपाय योजून व कारभार सुधारल्याचे दाखवून जनमताचा ओघ काँग्रेसच्या बाजूस आपण वळवू व निवडणुका जिंकू असा इंदिरा गांधींचा आडाखा आहे.

## नेतृत्वातयाच्या मर्यादा

इंदिरा प्रतिमेच्या आणि इंदिरा लाटेच्या बळावर १९७१ च्या लोकसभा निवडणुका व १९७२ च्या विधानसभा निवडणुका काँग्रेसने जिंकल्या; पण इंदिरा प्रतिमेचे पूर्वीचे वजन आता राहिलेले नाही. जनतेला दिलेली आश्वासने पुरी करण्यात इंदिरा गांधी यशस्वी झालेल्या नाहीत. काँग्रेसच्या फुटीनंतर त्यांच्या नेतृत्वाखाली नवी शिस्तबद्ध, समाजवादी कार्यक्रमाला बांधलेली आणि तो निर्धाराने अंमलात आणणारी, संधिसाधूंना थारा न देणारी काँग्रेस निर्माण होत आहे अशा अपेक्षा इंदिरा गांधींनी

व त्यांच्या सहकाऱ्यांनी जनतेच्या मनात निर्माण केल्या होत्या. मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, कमाल जमीनधारणेची मर्यादा खाली आणणे, गव्हाचा घाऊक व्यापार ताब्यात घेणे यासारखी काही धडाडीची पावले त्यांनी टाकली; पण समाजवादी कार्यक्रम प्रभावीपणे अंमलात आणण्यासाठी नोकरशाहीची पुनर्घटना करणे आणि शिस्तबद्ध पक्षसंघटना उभारणे या दोन गोष्टी त्या करू शकल्या नाहीत व त्यांच्या नेतृत्वाच्या मर्यादा स्पष्ट दिसून आल्या. इंदिरा गांधींची नवी काँग्रेस आणि पूर्वीची काँग्रेस यात काही फरक राहिलेला नाही. संधिसाधूंची खोगिरभरती नवकाँग्रेसमध्ये झालेली आहे. अशा परिस्थितीत १९७१ आणि १९७२ सारखे यश उत्तर प्रदेशच्या निवडणुकात काँग्रेसला मिळण्याची शक्यता फार थोडी आहे. उलट १९६७ ची पुनरावृत्ती होण्याचीच अधिक शक्यता आहे.

त्रिपाठी मुख्यमंत्रिपदावर राहिले किंवा न राहिले तरी उत्तर प्रदेश काँग्रेसमध्ये फूट पडण्याचा संभव आहे. विधानसभा काँग्रेसपक्षात त्रिपाठीविरोधी गट आहे. त्रिपाठींना मुख्यमंत्रिपदी ठेवले तर हा गट बाहेर पडण्याची किंवा निवडणुकीत असहकार करण्याची शक्यता आहे. उलट त्रिपाठींना नेतेपदावरून दूर केले तर त्यांच्या गटाचे लोक काँग्रेसमधून बाहेर पडले नाहीत तरी निवडणूक मोहिमेत असहकार करण्याचा संभव आहे.

निवडणुकीत काँग्रेसला विजय मिळविणे यामुळे कठीण असले तरी विरोधी पक्षांची परिस्थितीही काही मोठी आशाजनक नाही. विरोधी पक्षांच्या आघाड्यांचे प्रयत्न होतील, पण त्यांच्या हाती सत्ता दिली तरी ते काँग्रेसपेक्षा चांगला कारभार करून दाखवू शकत नाहीत, हा १९६७ चा अनुभव जनता विसरलेली नाही. अलिगड मुस्लिम विद्यापीठ कायद्यात दुरुस्ती झाली पाहिजे या मुस्लीमलीगच्या मागणीला काही विरोधी पक्षांनी पाठिंबा दिला यावरून मुस्लिम मते मिळविण्यासाठी मुस्लिम जातीय वादाला विरोधीपक्षही कसे खतपाणी घालीत आहेत हे स्पष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत मतदार निवडणुकीत उदासीन राहण्याचाच अधिक संभव आहे. काँग्रेसला निर्णायक बहुमत मिळणे कठीण असून निवडणुकीनंतरही उत्तर प्रदेशात राजकीय अस्थिरता कायम राहील असे आज तरी दिसते. चार-पाच महिन्यात राजकीय चित्र स्पष्ट होऊन अधिक निश्चित अंदाज बांधणे शक्य होईल. उत्तर प्रदेशच्या निवडणुकांनी देशाच्या राजकारणाला निराळी कलाटणी मिळण्याचीही शक्यता आहे

● ● ●

### पिंपळगाव बसवंत येथील कांदा निर्जलीकरण कारखाना

## दुलाजी सीताराम पाटील, एम. एल. ए. यांचा

# खुलासा

पिंपळगाव बसवंत येथील कांदा निर्जलीकरण कारखान्यासंबंधी काही वर्तमानपत्रातून ज्या विपरीत बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत त्याबद्दल मी खुलासा केला नाही; तर कारखान्याच्या असंख्य सभासदांमध्ये गैरसमज पसरून, कारखाना उभारणीच्या कामात व्यत्यय आल्याशिवाय राहणार नाही. सदरच्या बातम्या देण्याची प्रेरणा देणारे जे माझे राजकीय विरोधक आहेत, त्यांची मला कीव येते. त्यांनी विरोधासाठी निवडलेले हे चुकीचे क्षेत्र आहे. ज्या राजकीय क्षेत्रात माझ्याशी झगडताना त्यांना माघार घ्यावी लागली ते क्षेत्र न निवडताना, ज्याच्याशी माझ्या असंख्य शेतकरी बंधूच्या जीवनाचा प्रश्न निगडीत आहे ते सहकार क्षेत्र निवडून शेतकऱ्यांच्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या या कारखान्याचाच 'बट्टयाबोळ' करण्याचा विचार त्यांनी अवलंबिलेला दिसतो. परंतु माझी संपूर्ण खात्री आहे, की माझ्या शेतकरी बंधूंचा त्यावर काडीमात्रही विश्वास बसणार नाही. केवळ त्यांच्या माहितीसाठी म्हणून वर्तमान पत्रातून माझ्यावर जी राळ पाखडली; त्याचा विगतवार खुलासा मी खाली देत आहे.

### १ : पांढऱ्या कांद्याचा व्यवहार

पांढऱ्या कांद्याच्या व्यवहारासंबंधी वर्तमानपत्रात बराच गहजब केला. हा निर्णय दुलाजी पाटील अगर दुसऱ्या कोणा व्यक्तींचा नसून, संचालक मंडळाचा तो निर्णय आहे. कारखान्यातील उत्पादनास मार्च ७२ मध्ये सुरवात करावी लागेल व त्यानुसार पांढरा कांदा (कच्चा माल) सुमारे ११००–१२०० टन पहिल्या सिझनमध्ये मिळवावा लागेल, यासाठी मुंबई येथे असणाऱ्या यासंबंधी काही तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार कार्यक्रम ठरविला. पांढरा कांदा पिकविण्यास सभासदांना उत्तेजन देण्याच्या दृष्टीने त्यांना कारखान्याने पांढऱ्या कांद्याच्या बियाणाचा पुरवठा केला. पहिल्या ट्रायल सिझनपुरता माल मिळविण्यास अडचण पडू नये म्हणून

सभासदांकडून करारनामेही करून घेतले. दरम्यान कारखान्याची परदेशातून येणे राहिलेली मशिनरी येण्यास काही अनपेक्षित कारणामुळे अडचणी निर्माण झाल्या. देशी मशिनरीसाठी लागणारा जादा पैसा देण्यात महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडूनही काही अडचणी निर्माण केल्या गेल्या. सभासदांना माल उत्पादन करण्यास उत्तेजन दिल्यानंतर माल घेण्याचेही बंधन आपल्यावर राहिल. कदाचित तसे न केले तर कारखान्यावरील सभासदांचा विश्वास जाऊन प्रत्यक्ष मालाची जरूरी भासेल त्यावेळी माल मिळणार नाही. तसे होऊ नये म्हणून किमान धोका पत्करून कारखान्याने दर क्विंटलला रुपये २७ दराने पांढरा कांदा खरेदी करण्याचे ठरविले. हा भाव फार झाला, अशातला प्रश्न नाही. नाशिक येथील ए. सी. एन. डी. हॉयड्रट्स या कांदा कारखान्याने तर त्याचवेळी रुपये ३३ दर क्विंटल या दराने भाव जाहीर केला होता.

आमच्या कारखान्याने वरील दराने घेतलेला माल निवडक व ठराविक आकाराचा घेतल्याने सभासदांचा सुमारे $\frac{1}{8}$ ते $\frac{1}{2}$ माल हा नाकारून परत केला गेला. यात सभासदांना, आम्ही वेडचा सारखा जादा भाव देऊन पैसा अनाठायी खर्च केला हे म्हणणे साफ चुकीचे आहे.

काही दिवस योग्य भाव येईपर्यंत थांबावे लागते. त्यात काही घट ही येणारच. संभाव्य नुकसानीची जाणीव संचालक मंडळास मी करूनही दिली होती. या धंद्यात असणाऱ्या व्यापाऱ्यांना जे आर्थिक नुकसान सोसावे लागते त्यापेक्षा कारखान्याला विशेष नुकसान आले, अशातला मुळीच प्रकार नाही. परंतु ज्यांना अशा व्यवहाराचे सोयरसुतक नाही, त्यांना त्यातल्या अडचणी काय, हे कसे समजणार ?

## २ : बल्गेरियाचीच यंत्रसामुग्री का ?

यानंतर बल्गेरियाचीच यंत्र सामुग्री का निवडण्यात आली याबद्दलही निराधार शंका निर्माण केली. ही मशिनरी केंद्र सरकारच्या संबंधित खात्याच्या सल्ल्याने घेण्यात आली. रुपयाच्या चलनात (Rupee currency) पैसा स्वीकारणाऱ्या देशांकडून मशिनरी घेण्याचे ठरविल्यास ती मिळणे सुलभ होऊन त्यास फारसा विलंब लागणार नाही असाही सल्ला त्यांचेकडून मिळाला. मशिनरीसाठी 'इंडियन ट्रेड जर्नल' नवी दिल्ली या पाक्षिकात जाहिरात दिली व त्यानुसार फक्त 'एम्बॅसी ऑफ पिपल्स् रिपब्लिक ऑफ बल्गेरिया' टेक नो एक्सपोर्ट सोफिया बल्गेरिया या कंपनीकडून किंमत प्रोजेक्ट रिपोर्ट इ आला व त्याचा स्वीकार संचालक मंडळाने केला. अशा परिस्थितीत बल्गेरियन मशिनरी घेण्यात काही तरी विशिष्ट गैर हेतू आहे. असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट अतिशय हीन मनोवृत्तीची आहे.

## ३ : सल्फीटेटरचे गूढ

ज्या सल्फीटेटरचे खरेदीबद्दल एवढे काहूर निर्माण करण्याचा वर्तमानपत्रां-द्वारे प्रयत्न झाला, त्याची कथा तर फार निराळी आहे. सल्फीटेटर तर हा मूळ योजनेतील यंत्रसामुग्रीचाच भाग आहे. तो घेणे वाजवी की गैर-वाजवी हा तर प्रश्नच नाही. ज्या सोफियातील अशा निर्जलीकरण कार-खान्याला आम्ही भेट दिली तेथे तर तो आहेच.

कांदा हेच या कारखान्याचे 'लक्ष्य नसून ' द्राक्ष, पोटचाटो ' कॅबेज, कॉली फ्लॉवर, इ. भाजीपाला यावरही यांत-प्रक्रिया करण्याची योजना असल्याने संचालक मंडळाने सल्फीटेटर घेण्याचे ठरविले. प्रश्न आहे किंमतीचा. रुपये ७२,००० चे ऐवजी रुपये २२०,००० देण्यात दुलाजी 'पाटील यांचा फार मोठा हात आहे असे दाखविण्याचा प्रयत्न झाला. मला येथे स्पष्ट करा-वयाचे आहे, की या सल्फीटेटरची मूळ किंमत ज्या करारनाम्यात दाखविली त्यातच म्हटले आहे की, सल्फीटेटर या पार्टची किंमत ' टेकनो एक्सपोर्ट ' कंपनीशी बोलणी करून नंतर ठरवावी (Price of Sulphitator to be improved......will be subject to negotiation with M/S Techno export, Sofia during the visit of the representative of the buyers to Sofia) सोफिया येथील बोलण्यातही अंतिम निर्णय घेतला गेला नाही. कंपनीने या पार्टची किंमत रु. २२०,००० पत्रानी कळविली, किंम-तीत वाढ होण्याची विशिष्ट कारणेही त्यांनी दिली. संचालक मंडळाने त्यास मान्यता दिली व त्याप्रमाणे किंमत दिली गेली. यात कोणी कोणास फसविले असे म्हणावयाचे असेल तर ते म्हणणाऱ्यांनी सिद्ध करून देण्याची तयारी ठेवावी. माझ्या मनात यासंबंधी यत्किंचितही चिंता नाही.

## ४ : भागभांडवलांचा हिशेब

भागभांडवलाच्या रकमेपैकी फक्त रुपये ७४०० चा हिशेब बँकेच्या निर-निराळ्या शाखांकडून अद्याप येणे आहे. काही सभासदांनी भागभांडवलाच्या रकमा परभारे कारखान्याच्या खाती भरणा केल्या. परंतु नावनिशीवार माहिती कारखान्यास न कळविल्याने ही रक्कम केवळ अनामत म्हणून दाखवि-ण्यात आली. जसजशी नावनिशीवार माहिती मिळेल, तशी रक्कम संबंधित व्यक्तींच्या नावे जमा दाखविली जाईल. यात रकमेचा कोणताही गैरव्यापर झालेला नसताना हे पैसे पाण्यात गले, हे म्हणणे शुद्ध वेडेपणाचे आहे.

## ५ : कारखान्यात गवताचा साठा

जमेल त्या पद्धतीने जनतेची दिशा-भूल करण्याचा आणखी एक प्रकार म्हणजे पिंपळगाव बसवंत बागाईतदार संघास दुष्काळपीडित जनावरांकरिता गवत साठविण्यासाठी जागा दिली त्या-बद्दलचा. कारखान्याजवळ १० एकर मालकीची जागा आहे. पैकी २ एकर जागा इमारतीच्या बांधकामात अडकली. बाकी ८ एकर जागा खुली आहे. ही

एका सहकारी संस्थेच्या मालकीची खुली जागा दुसऱ्या एका सहकारी संस्थेस दुष्काळी परिस्थितीत गवत साठविण्यासाठी विना भाड्याने दिली यात काही गैर केले असे मला तरी वाटत नाही. टीकाकारांना संकटग्रस्तांना देखील मदत करण्याचा दृष्टिकोन नाही. त्याला आपण काय करू शकणार ?

### ६ : ॲम्बेसेडर गाडी

आणखी एक बाब आमच्या टीकाकारांना मिळाली. ती म्हणजे ॲम्बेसेडर गाडी. कारखाना उभारणाच्या सुरुवातीस एक जीप गाडी कारखान्याने घतली. हेतू हा, की सभासदांकडून लागणारे सुरुवातीचे सुमारे १२ लाख रुपये भाग भांडवल त्वरित गोळा करता यावे तसेच सभासदांमध्ये पांढरा कांदा निर्मितीसाठी चालना द्यावी व कारखान्यास योग्य वेळी पुरेसा कच्चा माल उपलब्ध होईल अशी परिस्थिती निर्माण करावी. दुष्काळाची बिकट परिस्थिती असतानादेखील ४ लक्ष रुपयांचे भागभांडवल या वाहनाच्या साहाय्याने जिल्ह्यात फिरून जमा केले. कारखान्याचे कार्यक्षेत्र सबंध जिल्हा असल्याने वाहनाची तर जरूरी. परंतु जीप गाडीला पेट्रोलचा खर्च जादा येतो तो कमी करावा, म्हणून व करारनाम्यानुसार बल्गेरियन तज्ज्ञांना मशिनरी उभारण्याचे वेळी असे वाहन पुरविण्याचे बंधन असल्याने त्यांची ही सोय व्हावी म्हणूनच जीप गाडी विकून ॲम्बेसेडर गाडी घेण्यात आली.

कारखान्याच्या उभारणीचे काम लांबणीवर पडणार असे दिसताच ही गाडी विकण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला. परंतु संचालक मडळाच्या बहुसंख्य सभासदांच्या दृष्टीने लिलावात बोललेली अखेरची किंमत कमी वाटल्याने गाडीची विक्री तहकूब केली. चेअरमनपदाची सूत्र गेल्या ७३ च्या जानेवारीपासून मी सोडल्याने या गाडीचे दैनंदिन नियंत्रणाची जबाबदारी माझ्यावर येऊ शकत नाही.

### ७ : गेस्ट हाऊसचे बांधकाम

कारखान्याच्या पैशाच्या गैरवापरासंबंधी आणखी उदाहरणे देताना गेस्टहाऊसवर एक लक्ष, पंचवीस हजार रुपये विनाकारण खर्च केल्याचे म्हटले आहे. करारनाम्याच्या शर्तीनुसार मशिनरी उभारणाऱ्या परदेशातील दोन तंत्रज्ञांना राहण्यास सर्व सोयींनी युक्त अशी जागा देण्याचे बंधन आहे. त्यांना फॅक्टरीजवळ जागा बांधून देणे अगर नाशिकसारख्या ठिकाणी जागा उपलब्ध करून देऊन त्याचे भाडे, लाईट, पाणी इत्यादी खर्च भरणे एवढेच शिल्लक होते. नाशिकचा खर्च परवडेनासा दिसल्याने गेस्ट हाऊस (हल्लीच्या इमारतीतच वेगळ्या २ खोल्या) बांधण्याचे ठरविले. ते बांधताना ऑफिस, पक्का माल ठेवण्यासाठी गोडाऊन व कँटिनसाठी त्यातच जागा याचीदेखील तरतूद करावी या उद्देशाने ही इमारत बांधली. या सर्व इमारती वेगवेगळ्या बांधल्या असत्या तर कदाचित २ लाख रुपयांपर्यंतदेखील खर्च वाढला असता. यात कोणत्याही प्रकारे

संस्थेच्या पैशांचा गैरवाजवी खर्च झालेला नाही. उलट त्यात बचत झाल्याचे दिसून येईल.

### ८ : कांद्याच्या चाळी

कांदा साठविण्यासाठी २ चाळी बांधण्यात झालेला खर्च रुपये २५३९४ पैसे २८ (पसतीस हजार नव्हेत) हा अनाठायी आहे. असे निदान या कारखान्याशीं निगडित असणारे आमचे शेतकरी बंधू तरी म्हणणार नाहीत. ज्या आमच्या टीकाकारांनी पिंपळगावजवळून आग्रा रोडने जाताना गवताचे छप्पर असलेल्या अगर सर्वसाधारणपणे बांधलेल्या चाळींव्यतिरिक्त चाळी पाहिल्या नाहीत त्यांना कदाचित् हा खर्च जादा असे वाटेल. हा दोष त्यांच्या अननुभवीपणाचा. याला इलाज कोणता ! कांदे घेण्याचा ज्यावेळी निर्णय घ्यावा लागला त्याच वेळी त्याच्या साठवणुकीची व्यवस्था करणे अपरिहार्यच होते.

### ९ : परदेश दौरा

आमच्या टीकाकारांना आम्ही केलेल्या परदेशदौऱ्यात विपरीत असे काय दिसले हे समजत नाही. परदेश दौरा करण्यापूर्वी त्यासंबंधी लागणारी परवानगी महाराष्ट्र शासनाकडून मिळविली होती. या कारखान्यात उभारण्यात येणाऱ्या मशिनरीसारखी चालू असलेली मशिनरी समक्ष पहावी व पक्क्या मालासाठी परदेशात बाजारपेठ मिळण्याची शक्यता अजमावावी यासाठी कारखान्याच्या संचालक मंडळाने ठराव करून दौऱ्यास संमती दिली होती. त्यानुसारच हा दौरा केला व ज्या हेतूसाठी पाठविण्यात आले होते, त्या हेतूने कामकाजही केले. अशा प्रकारचा दौरा आम्ही करावा असे टेकनो एक्सपोर्ट कंपनीचे एक पत्रही कारखान्यास आले होते. त्यात त्यांनी श्री. दुलाजी पाटील व श्री हिरे यांना निमंत्रित केले होते.

सदरच्या झालेल्या प्रवासखर्चाची मागणीदेखील कारखान्याच्या वतीने कंपनीकडे केली आहे; तेव्हा हा प्रवास केवळ मजेखातर केलेला नसून त्यातून मिळालेल्या माहितीचा उपयोग कारखान्यास व्हावा या हेतूनेच केलेला आहे.

### १० : तो प्रोजेक्ट रिपोर्ट आलाच नाही म्हणे

काही गैरवाजवी खर्चाची माहिती देताना रुपये ७ हजार 'इंटर नॅशनल इक्विपमेंट कॉर्पोरेशन' मुंबई यांना कारखान्याचा प्रोजेक्ट रिपोर्ट करण्यास दिले, परंतु प्रोजेक्ट रिपोर्टच आला नाही, असेही आमच्या टीकाकारांनी म्हणण्यास कमी केले नाही. हे विधान साफ खोटे आहे. या कंपनीचा प्रोजेक्ट रिपोर्ट कारखान्यात आलेला असून या कंपनीची यंत्रसामुग्री ज्या देशातून येणार तो देश फ्रान्स असल्याने व रुपयात (Rupee Currency) व्यवहार होणे शक्य नसल्याने तो विचार बदलणे भाग पडले व केंद्र सरकारच्या संबंधित खात्याच्या सल्ल्याने 'बल्गेरियन' मशिनरी घ्यावी लागली.

### ११ : विमान भाडे

विमान भाडे इत्यादी बाबी किरकोळ अनाठायी खर्चाच्या दाखविल्या, त्यासंबंधी संचालक मंडळाने मान्यता

दिलेली असून सर्वसाधारण सभेनेही असे सर्व खर्च मंजूर केलेले आहेत. श्री. हिरे हे उपमंत्री असतानादेखील कारखान्याच्या संचालक मंडळावर संचालक म्हणून राहिले व दैनंदिन शासकीय कामकाजाच्या गर्दीतून वेळ काढून दिल्लीसारख्या ठिकाणी कारखान्याच्या कामासाठी त्यांना बरोबर नेण्याकरिता विमान प्रवास करावा लागला. त्यामुळेच त्यांच्या सहकार्याने आयात परवाना, एन्. सी. डी सी. कर्ज मंजुरी इत्यादी कामे त्वरित करता आली. कारखाना उभारणीच्या कामातील अडीअडचणींचा ज्यांना अनुभव नाही त्यांच्याजवळ टीका करण्यापलिकडे दुसरे काय असणार ?

## १२ : सेवकांच्या नेमणुका

कारखान्याच्या कामास सुरवात नसताना फूड टेक्नॉलॉजिस्टची नेमणूक केली या बद्दलही टीका करण्यात आली. श्री. डेव्हिस या गृहस्थांची केमिस्ट कम् प्रॉड्क्शन मॅनेजर या जागेवर नेमणूक करण्यापूर्वी मुंबई येथे संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली. त्यावेळी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे टेक्निकल ॲडव्हायजर्स डॉ. काणे, डॉ. राव, डॉ. रेगे, व श्री. कर्णिक हेही उपस्थित होते. कारखान्याच्या उभारणीच्या वेळी अशा तज्ज्ञांची त्वरीत नेमणूक व्हावी या दृष्टीने त्यांनीच त्यावेळी काहींच्या मुलाखती घेऊन श्री. डेव्हिस यांची दरमहा रुपये ७५० वर नेमणूक करण्याची शिफारस केली व त्यानुसारच या अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. कारखान्याच्या उभारणीस विलंब लागेल म्हणून त्यांस नोकरीतून मुक्त करण्यात आले. याच कमिटीने मेकॅनिकल इंजिनिअर म्हणून श्री. भाटिया यांची नेमणूक करण्याचा सल्लाही दिला होता. परंतु ते गृहस्थ हजर झाले नाहीत.

## १३. मग कारखान्याचे काम अडले कोठे ?

अखेर महत्त्वाची बाब ही, की आता कारखान्याचे अडले तरी कोठे ? कारखाना उभारणीच्या कामास शेतकरी बंधूंकडून रुपये ४ लक्ष भाग भांडवल जमविल्यावर, शासनानेही तेवढेच भाग भांडवल टाकले. त्याशिवाय एन्. सी. डी. सी. दिल्ली या केंद्रशासित संस्थेकडून रुपये १५ लाख ६० हजाराचे कर्ज मंजूर करण्यात आले. या संस्थेस कारखान्याकडून कर्ज फेड न झाल्यास त्याची हमी शासनाने घेतली. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबई मार्फत १४ लाख ७३ हजार रुपयांचे कर्जही देण्यात आले. बाकी राहिलेले कर्ज रुपये ८७ हजार शासनाने या सर्व रकमेस, महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला हमी दिल्याशिवाय देता येणार नाही, असे त्या बँकेने ठरविले. व त्यानुसार राहिलेले कर्ज ८७ हजारच काय परंतु कारखान्यास लागणारे वाढीव कर्जदेखील अडविण्यात आले. मिळालेला बहुतेक पैसा मशिनरी, इमारत, जमीन, विहीर, नोकरांचे पगार, इत्यादी खर्चात अडकून गेला. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक शासनाच्या हमीशिवाय (Default guarantee) पैसा देत नाही. शासन,

एन् सी. डी. सी. दिल्ली या संस्थेस एकदा हमी दिल्यावर त्याच कर्जाकरिता बँकेस पुन्हा हमी देण्यास तयार नाही. अशा पेचात राहिलेले कर्ज व दुसरे वाढीव कर्ज प्रकरण अडलेले. अशी आहे एकूण परिस्थिती. या बाबत आम्ही श्री. व्यंकटराव हिरे यांच्यासह सहकार आयुक्त श्री. पळणीटकर, महाराष्ट्र शासनाचे सहकार सचिव, बँकेचे मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. श्री. श्रीमाळ यांच्याशी चर्चा केली.

यात आता बँक, शासन व या कारखान्याचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक बोलावून निर्णय घेण्याचे ठरविले. तो पर्यंत आहे तीच परिस्थिती चालू राहणार हे स्पष्ट झाहे.

कारखान्याचे कामकाज व्यवस्थित चालण्याच्या दृष्टीने डॉ. श्री. श्रीमाळ यांनी एकवेळ कारखान्यास भेट दिली. त्यावेळी त्यांनी असेही सांगितले, की बँकेचा अधिकारी कारखान्याचे काम प्रत्यक्ष सुरू होईपावेतो बँकेच्या खर्चाने देऊ. तेही आम्ही मान्य केले.

पण अद्याप बँकेकडून, कोणाही अधिकाऱ्याची नेमणूक झाली नाही.

अशा प्रकारे या कारखान्यासंबंधी जो अपप्रचार वर्तमानपत्रातून चालविला, त्याबद्दल खुलासा केला आहे.

गेल्या सुमारे २५ वर्षांपासून मी सहकारी क्षेत्रात काम करतो. त्यातूनच ग्रामीण भागात मरेपर्यंत कष्ट करणाऱ्या माझ्या शेतकरी बंधूच्या उत्कर्षाकरिता काही करता येईल, असा माझा विश्वास आहे. माझ्यावर कितीही चिखलफेक करण्याचा प्रयत्न माझ्या विरोधकांनी केला तरी मी माझ्या ध्येयापासून यत्किंचितही ढळणार नाही. त्यांना मला एवढेच आर्जवून सांगावयाचे आहे आहे की – ज्या क्षेत्रांतील लढा त्या क्षेत्रांतच लढवा ? माझी त्यास केव्हाही तयारी आहे. त्याचे कितीही घोर परिणाम असेनेत; ते भोगण्यास मी तयार आहे. परंतु ज्यांच्यामध्ये मी रात्रंदिवस काम करतो, त्यांची दिशाभूल करून माझे चारित्र्य कलंकित करण्याचा व्यर्थ प्रयत्न कृपया करू नका. कारण 'न भीतो मरणादस्मि केवलम् दुषीतम् यशः' हेच मी माझे ब्रीदवाक्य मानतो. ● ● ●

---

निसर्ग उदार आहे आणि मनुष्य हावरट आहे. निसर्गसंपत्तीचा काटकसरीने आणि हिशोबीपणाने वापर करण्याचा विचारही त्याच्या मनाला शिवत नाही. तो विचार त्याने तातडीने करायला हवा आहे. कारण, एका अहवालाप्रमाणे, येत्या २९ वर्षात सोन्याचा साठा संपुष्टात येईल; ४१ वर्षात पारा, ४२ वर्षात चांदी, ४८ वर्षांत तांबे, ५० वर्षात पेट्रोल आणि झिंक, ५५ वर्षात अल्युमिनियम, ६१ वर्षात जस्त आणि ५४ वर्षांत शिसे यांचे साठे संपतील. कोळसा अजून फक्त १५० वर्षे आणि लोखंड अवघे १७३ वर्षे पुरेल.

खरे तर सारी निसर्गसंपत्ती संपल्यावर माणसाला विचार करायला केवढी तरी सवड मिळेल.

हाय, मोगलाई ! भाग दुसरा : चँदनी

# एक : मोहमदअली जिना

सिनिक्

इ. स. १९४६ चा उल्हाळा आला. तो कुठे बाहेर जावयाच्या ऐवजी हैद्राबादीच काढावयाचे ठरवले. पुण्यास परीक्षा संपताच मी सरळ हैद्राबादी आलो. आल्याबरोबर कोणकोण मित्र-मंडळी आहे याची चवकशी केली. नक्की कळले नाही. रखरखीत उन्हात कुठे बाहेर पडावे, म्हणून विसावलो. संध्याकाळी हैदरगुड्याकडे निघालो. निश्चित कुठे जायचे हे न ठरवता निघालो. थकलो नाही तर टँकबंडवर जावे, कदाचित् तिथे यार लोक भेटतील अन् मग पुढचा कार्यक्रम ठरवावयास नको...

हैद्राबादच्या वातावरणात आतून राजकीय दृष्ट्या बरेच मूलभूत फरक पडत आहेत असं कानावर आलं होतं. पण रस्त्यावर वर्दळ पूर्वीसारखीच होती. मात्र वाटेत एकीकडे मोठी मसज्जीद खडी झालेली दिसली. हिरव्या रंगाने नजरा वेधून घेणाऱ्या त्या मसजिदीत कुराण पढावयास पाचशे ते हजार इस्लामच्या सपूतांची सोय होती. मसजिदीत चांगलीच गजबज दिसली. त्या वस्तीत नेहमी न आढळणारे बरेच हजरत आढळले. हैद्राबादी बाहेरच्या पैगंबर प्रेमिकांची आवक चालूच असायची त्यामुळे मला ती घटना बुद्धयाच नोंदून घेण्याची गरज वाटली नाही... या रस्त्यावर वस्ती वाढत असल्याचे लक्षण दिसत होते......

मी चालतच होतो. कुणाकडे जावे याचा निश्चय होत नव्हता. तोच अंगावरून कुणीतरी परिचित गेल्याचे जाणवले. कोण असावे बरे ? नक्कीच तो तालिबुल हक्क होता. मी जे दोन महिने जामिया उस्मानियात होतो त्या वेळेस तो माझा केवळ वर्गमित्र राहिला नव्हता. दोस्त झाला होता. जामिया उस्मानियात शरीक झालो तो घरच्या लोकांच्या आग्रहामुळे; पण तिथे मी कधीच समरस झालो नाही. बरोबरीचे वर्गातले अनेक हिन्दु आणि स्नेही मित्रे, बोटचेपे होते. मुसलमान विद्यार्थी आक्रमक, खोड्या करणारे, कुचाळकीच्या शोधात असणारे आणि कमालीचे व्रात्य होते. मी त्यामानाने

स्वतंत्र वृत्तीचा होतो. खंबीर होतो. काही अंशी बंड होतो. कुणाला दबत नव्हतो. प्राध्यापकाशी पण माझे खटके उडाले होते. त्यावेळेस माझी साथ फक्त तालिबुल हक्कने केली. त्याचा मला नैतिक पाठिंबा होता. युनिव्हर्सिटी सोडण्याचे विचार मी बोलून दाखवताच तो मला धीर देई. परावृत्त करण्याचा प्रयत्न करी. वातावरण लवकरच अनुकूल बनेल अशी आस दाखवायचा. यामुळेच आमच्या परिचयाचे रूपांतर निकट आपुलकीत झाले. मी त्याच्या घरी जायचा. सगळे मला आपलाच म्हणून वागवायचे. त्यांच्याकडे नावाचा पडदा होता. कारण ते मूळचे उत्तर हिन्दुस्थानातले होते. त्याचे आईवडील आणि दोन्ही बहिणी माझ्याशी मोकळेपणानं बोलत. अमीना व सकीना या त्याच्या बहिणी—मी त्यांच्या घरी गेलो की मला जेवू घातल्याखेरीज सोडत नव्हत्या. असा तालिबुल हक्क माझ्या अंगावरून गेला. मला न पाहता, ओळख न देता गेला. मला कसंसंच वाटू लागलं. अंतर्यामी दुखावलो गेलो. काही उकलेना. त्याने मला पाहिले नसावे. छे छे ते शक्य नव्हते. बाजूने किंवा कोपऱ्यावरून तो गेला नव्हता. अगदी समोरून आला आणि चक्क अंगावरून गेला—

मी स्वतःचाच तलास घेऊ लागलो की, आपल्याकडून काही चूक तर झाली नाही त्याच्याशी वागण्यात, त्याच्या आईवडिलांना खिन्नता वाटावी असं तर काही घडलं नाही ? आपण अमीना-सकीना यांच्याशी फार खुलमखुला बोलतो यात त्यांनां काही आक्षेपार्ह तर वाटलं नाही ? मी जसा, स्मृतीला आणि कल्पनेला ताण देऊ लागलो तसा परेशानीत अधिक गुरफटला जाऊ लागलो. गुन्हा कळला नाही, आणि शिक्षा भोगावी लागली, अशा वेदनेनं घायाळ झालो. मनाच्या संवेदनक्षमतेच्या सगळ्या तारा कुणीतरी राठ बोटांनी निर्दयतेनं छेडल्यात असं वाटू लागलं...

—कुणाचा तरी ओळखीचा आवाज कानावर पडला. कुणीकडून आवाज आला याचा मी शोध घेऊ लागलो. पुन्हा तो आवाज आला. आवाज नव्हता. हाक होती. मी वळून पाहिलं तो अमीना बोलावत होती. मला काहीच उमजेना. काय करावं कळेना, चालताचालता मी त्यांच्या घरावरून गेलो होतो. तिकडून गेलो की, तिथं थांबून जावयाचा. घाईत किंवा कामात असलो तर परत येतो असं आश्वासन देईपर्यंत सुटका होत नव्हती आणि आज तसेच माझ्या पावलांनी मला पुढे नेले. पण हमरस्ता सोडून हीच माझी पाऊलं त्यांच्या घराकडच्या वाटेकडे वळली तरी कशी ? मनाच्या अबोधात शिरण्याचे धैर्य होऊ नये इतका मी कमजोर होतो त्याक्षणी. मनाच्या तात्काळ झालेल्या प्रतिक्रियांच्या पृष्टभागावरच तरंगणे बरे वाटले. युक्तिवाद आला की, तालिबुल हक्क ओळख न देता अंगावरून गेला तेव्हा तुला जसं वाटलं अगदी तस्संच तू तसाच पेहचान न देता पुढं गेलास तर त्याच्या घरच्या लोकांना नाही का वाटणार ?

—माझी पाऊले मागे फिरली. दारात फार उभं राहूणं बरं दिसणार नाही म्हणून अमीना आत गेली मला पाहत. मी तिच्या पाठोपाठ गेलो. तिथे माझे स्वागतच होणार होते. मी तसाच चाललो होतो याबद्दल हलकीसी तक्रार होती. 'क्या खता हुई हमारी औरसे' असं ती मधाळ बोललीही 'ऐसेही तकते हुए कितनी देर खडे रेहोगे? आओ, तश्रिफ रखो—' त्यांची अम्मी जान म्हणाली. बाहेर गेलेली सकीना एव्हाना आली होती. मला पाहताच म्हणाली, 'आज चांद टपक-पडा—' मी सारा ताण एका क्षणात नाहीसा झाल्याचं अनुभवलं. निर्मळ प्रेमाची ही माणसं खास जन्नतचीच अवलाद असली पाहिजे असा मनाचा एक रम्य तंतु झंकारला...

—नेहमीसारखं ठरलं की, मी जेवूनच जायचं. अम्मीजान 'फार उशीर नाही होणार' म्हणत बावरचीखान्यात गेल्या. बैठकीत समोर अमीना आणि कडेला सकीना बसली होती. अमीना सावळी होती तर सकीना गोरी होती. दोघींना विपुल केशसंभाराचं देणं लाभलं होतं. फक्त अमीनाचे केस काळेभोर होते तर सकीनाचे भुरके होते. अमीनानं सैलशी वेणी बांधली होती. ती तिच्या छातीवर रुळत होती. सकीनाचे केस मोकळेच होते. दोघी तेल लावत नव्हत्या. त्यांच्या केसभूषेत, पाहणाऱ्याला त्या बेफिकीर आहेत असं वाटावयास लावण्याचे कसब होते. जाण होती. निवड होती. देहस्विता होती. दोघींची तबियत निहायत तन्दुरुस्त होती. बांधा सडपातळ पण रसरशीत वाटे. वयात आलेल्या त्या दोघी आतापर्यंत इतक्या निःसंकोचपणे माझ्याशी वागत की, मी त्यांचा विचार तरुण स्त्रिया म्हणून कधीच जागेपणी केला नाही. आज मात्र मी त्यांच्याकडे एकटक पाहत होतो. कदाचित तालिबुल हक्क आणि त्याचे वडील घरी नव्हते म्हणून असेल. कदाचित् आजची माझी मनोवस्थाच अशी होती, की ते दुसऱ्या टोकाला जात होते. मी त्या दोघींना पाहता पाहता फुलारून गेलो. 'आरोग्य आणि यौवन हे स्वभावतःच सुंदर असते' असं कुठंतरी वाचल्याचं वाक्य अमीना—सकीनाना पाहूनच प्रस्फुटीत झालं असावं. माझं असं अनिमिष पाहणं तिला (सकीनालासुद्धा) मुळीच खटकलं नाही. बोचलं नाही. त्या दोघी अगदी निर्लेप बसल्या होत्या. त्यांचं तसं निर्भिर आणि निर्वैर बसणं पाहून माझ्या मनात शायर गालिब गुणगुणला, 'ती जितकी सुंदर तितकाच तिचा आत्मविश्वास दांडगा आहे. आपल्या माऱ्यापुढे कुणी वाचू शकत नाही ह्याची तिला खात्री आहे. मग विनाकारण परीक्षा पहा कशाला?'

माझी तंद्री भंग करत अमीना म्हणत होती, 'आज काय तुझा मौनवार आहे?—'

तिच्या ह्या सवालाने मी जरा हिंदकळलो. एकूण तिच्या लक्षात आले की, आज आपली तिच्याकडे पाहण्याची नजर वेगळी होती. परंतु हा अंतर्मुख विचार नैतिकतेच्या पातळीवर घुटमळतो



'आज काय तुझा मौनवार आहे ?'

आहे हे लक्षात येताच माझ्या मनाने त्याला वाद करत, समाजशास्त्रीय अवगुंठनाचा आश्रय केला. माझे मन म्हणू लागले की, मुसलमान समाजात जनाना पाळत असल्याने स्त्रियांची कामनिरपेक्ष पुरुषसहवासाची भूक भागत नाही, म्हणून या मुली माझ्याशी इतक्या बेतकलुफीनं बरताव करतात. त्याचा दुसरा कोणता अर्थ करणे किंवा लावणे गैर होईल–

'आज तुम्हे क्या हुआ है ?' – सकीनाने मला जरा ढोसण्याकरता मिस्किलपणे म्हटले. त्यांना निरुत्तर करण्याकरता त्यांचा भाऊ कसा तुटकपणे माझ्याशी वागला हे सांगावं असं मला सेकंदभर वाटलं. पण त्याने सहज सुखद असलेल्या वातावरणात उगाच अफरातफर झाली असती. वागण्यावर दाब आला असता. मने स्वतःत लोपली असती. कुणालाच बरे वाटले नसते. उमलणारे वातावरण कोमेजले असते. पण फार वेळ अबोल राहून चालण्यासारखे नव्हते. कारण एक तर त्या पोरींनी पिच्छा केला असता. मस्करी केली असती. दुसरे असे की, कदाचित चोरपावलांनी गैरसमज मनात शिरला असता. म्हणून मी एकदम उदगारलो, 'तुम लोग इतने अच्छे लगते हो की बस देखतेहि रहना ऐसी मुसलसील कशीष होती है–'

'बस बस, बनाना छोडो। कुछ कहो, सुनावो. तुम्हारे मराठीमें क्या नया लिखा गया. बताव–अम्मीजान हमेशा पूछती है. उन्हें बुलाती हूं–' असं म्हणत अमीनानं 'अम्मीजाऽऽन' अशी हाक मारली.

माझ्या मनात आलं की, सांगावं तुम्ही दोघी तरुणी हाच माझ्या नव्या

कथेचा फॉर्म. नीति-अनीतीच्या पल्याड जिथे शब्दांना जवानी, रंग, रूप आणि मस्ती भिडते तिथे माझ्या कथेचा नवा जन्म होणार आहे. मराठीचं हे नवं देणं लेणं ठरेल. मी गुंगलो. नादलो. अम्मीजान बैठकीत आल्याची दखलही घेतली नसती. पण तोच तालिबुलहक्क आला. त्याला माझी उपस्थिती फारशी रुचली नसावी, असं त्याच्या चेहऱ्याचं बारकाईनं निरीक्षण करताना माझ्या लक्षात आलं. पण लगेच चेहऱ्यावरचे भाव बदलत व मला शराफत दाखवत तो अम्मीजानला म्हणाला, 'मला मीटिंगला जायचं आहे. खाना जल्दी निकलवाव–' मजकडे वळत म्हणाला, 'चलिए, बिस्मिल्लाह करेंगे–'

–दस्तरखान नेहमीप्रमाणे पांढरा स्वच्छ होता. मुसलमान लोक स्वच्छ नसतात या माझ्या विग्रहाला तालिबुल हक्कच्या घरातील या सदाच्या शुभ्र दस्तरखानने तडा दिला होता. त्यांच्याकडे रोज पांढरी चादर दस्तरखान्याला शोभवत असे...किंबहुना असे वाटे की तो दस्तरखान पाहून भूक नसणाऱ्याला भूक लागत असावी. त्यांच्या जेवणघरातील त्या परीटघडीतून बाहेर पडलेल्या रुपेरी चादरीला पाहून कुणालाही पटावे की अन्नभक्षणात पोषणाबरोबर स्वच्छता, मांगल्य आणि सौंदर्य यांचा मिलाफ असेल तरच ते जेवण...

जेवताना मी सहज विचारले की, अब्बाजान घरात दिसत नाहीत. त्यावर तालिबुल हक्क म्हणाला, 'ते मोहमदअली जिनांना भेटावयास गेले आहेत–' तालिब हे अशा ठेक्यात म्हणाला की वाटावे, त्या भेटीनंतरच कळेल तुम्हाला आमच्याशी कसं वागावं ते. आजही मी विचार करतो की, मला तसं भासलं की खरंच तालिबुल हक्कला तसं म्हणायचं होतं ? त्यांच्या दस्तरखानचा मनावर उमटलेला ठसा मात्र कोणत्याही विकल्पाने पुसला जात नाही... ●


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

# दोन : वंदे मातरम्

सारे खुशीत होते. खुशीत रंग भरण्याच्या प्रयत्नात होते. खुशी रंगीन झाली, की रस निर्माण होतो असा तेथं जमलेल्यांचा समज होता. रस आला की, अनुभवाची सुरसता येते. सुरसता जीवनाची समरसता आणते. जिंदगीचा लुत्फ अशानेच लुटता, लुटवता येतो. म्हणून प्रत्येकजण मन लावून काम करत होता. आजची बैठक अशी खुलली पाहिजे की, उमरभर त्याची याद राहिली पाहिजे....

गंधर्व कंपनीत गेलेला राम केवळ याच करता आला होता. पंढरीच्या वारीत आत्मनिर्भर व आत्मविस्मृत होणारा नागनाथ तबलजीही हजर होता. नागनाथराम ही मंडळी आमच्याकडेच वाढलेली, लहानाची मोठी झालेली होती. आनंदाच्या आणि उल्हासाच्या प्रसंगी यांची उपस्थिती नसती तरच जगावेगळे ठरले असते. या दोघांचा उत्साह नुसता उतु चालला होता....

—विठ्ठल मामा बैठक सजवण्यात जातीने लक्ष घालत होते. स्वभावाने ते अतिशय शौकिन होतेच. पांढऱ्या चादरी पसरणाऱ्यांना निक्षून सांगत होते की, एकही सुरकुती राहता कामा नये. दिसता कामा नये. हे काम हातानेच करावयाचे पंजाचा दाब देऊन, दुसऱ्याला टोके पकडावयास लावून, हळू हळू पंजा सर्व बैठकभर फिरला पाहिजे असे बजावत होते. कुणी चुकले, की स्वतः करून दाखवत. पानाची तबके किती हवीत, कुठे कुठे ठेवायची याच्या तपशीलवार सूचना दिल्या. कली का चुना, वरकचा लखनवी कत्ता, पिलीपत्ति, अजगर अली जर्दा, इलायची, लवंग ख़िवाम, साफ केलेली विड्याची कळिदार पाने, पिकदाण्या इ. इ. ची नीट व्यवस्था लागल्याची खात्री करून घेतली. इत्तरची खुशबू स्वतः पाहिली आणि मग पास केली. शेवटी जोरात म्हणाले, 'अब्दुल, मोतिया भरपूर जमा करून आणला आहे ना? मोतिया — फुलांचा राजा. त्याच्या वासानेच आजची मैफिल धुंद झाली पाहिजे. एकदा मला दाखव पाहू सुटी फुले किती आणि गजरे किती?— प्रत्येकाची फर्माईश वेगळी असते, कुणाला पत्तेदार टपोरी कळीच आवडते तर कुणाला गजरा लागतो, आण, तोंड काय पाहत उभा आहेस—"

अब्दुल्ला जसा मुन्तजिम तसाच मोठा हरदिल अजीज होता. आमच्या घरच्या आणि परिवारातील सर्व माणसांच्या लहरी सांभाळणे केवळ त्याला एकट्यालाच जमत असे. वास्तविक तो जे विठ्ठल मामाच्या तोंडाकडे पाहत उभा

होता त्याचे कारण त्याला त्यांना काही सांगायचे होते. पण विठ्ठल मामांच्या आज्ञेचा रोख पाहून तो 'जी हुजूर, अभी लाया' म्हणत विजेसारखा अदृश्य झाला आणि पाहता पाहता एक मोठे मोतियांनी मंडित तवक घेऊन आला. सुवास उधळणारा आणि धवलतेने खदखदणारा तो मोतिया पाहून कुणाचीही तबियत फटाका झाली असती. विठ्ठल मामा त्याच्या दर्शनाने मोहरून गेले. निहायत फिदा झाले. प्रसन्नतेनं उद्‌गारले, 'बहोत खूब!'

'लेकिन सरकार–' अब्दुल्लाने दबत दबत सूतोवाच केले.

'लेकिन क्या?–' विठ्ठल मामांनी चमकून विचारले.

'सब इन्तेजाम तो हुआ, सिर्फ एक बात की कमी रहेगी–'

'वह कौनसी? अभी वक्त है. बोलो अब्दुल्ला, ऐसी कौनसी मुश्किल है जो यह विठ्ठल हल नही कर सकता–'

'उसी लिए तो आपसे अर्ज की है–' खास और मशहूर दोनो तवायफे खिदमतमे हाजिर है. सिर्फ एक तवायक आनेके लिए एतराज कर रही है–'

'कौन रांड है वह–?'

"सरकार आपको तो मालूम है शहर में 'बंदे' क्या कुछ बोलते, वह गानेवाली सिर्फ एकही तवायक है और वही अडकर बैठी है. वह नही आयी तो आजके मेहफिल का मकसद् कौन हो जाएगा–'

"क्या कहती है–"

"कहती है, वह गाना गायेगी तो उसके पास आनेवाले सरकारी लोक नाराज हो जाएगे, तकलीफ देंगे–"

"और कुछ–"

"हां, कहती थी की ऐसा गाना जोखिम की बात है और वह इतने कम पैसे मे इतनी बडी जोखिम सरपे लेने के लिए तैयार नही–"

"कितना मंगती है–"

"बहुत ज्यादा रकम है सरकार–"

"जाव, कबूल है हमे–"

"लेकिन सरकार–"

'और फिर लेकिन क्या?–'

'बडे महाराज की मंजूरी? कहते थे, तंगी का जमाना है, संभल कर खर्चा करो–'

'उनसे पूछने गये ही क्यूं? मालूम नही आज के मेहफिले का सब खर्चा मेरा है?–जाव, किसीसे बोलना नही–'

अब्दुल्लाला असा जबाब पाहिजे होता. अशा हुकुमाची तामील करण्यात थाट आणि ऐट आहे असे तो मानत होता. बवचा लोकांच्या पुढे दुनिया सतत झुकली पाहिजे आणि त्याकरता आपण राबण्यात खरी शान आहे असे समजत होता. विठ्ठल मामाची आज्ञा होताच तो एकदम जोशमधे येऊन म्हणाला, 'अब साली, लाख सलाम करते हुए आयेगी–, बहोत नखरे कर रही थी–'

मेहफिलीचे प्रयोजन होते बाबूचे तुरुंगातून सुटून येणे. दीड वर्षापूर्वी सत्याग्रहात सामील झालेला बाबू परत आला. त्याची प्रकृती बिघडली नाही. उलट सुधारली होती याचा आनंद



' मालूम नहीं ?
आज के मेहफिल का
सब खर्चा मेरा है '

विशेष होता. जो तो त्याच्या मर्जीप्रमाणे वागत होता. त्याच्या मर्जीविरुद्ध कुणी जाऊ नये असा अलिखित आदेश जणू प्रत्येकजण पाळत होता. परंतु आजच्या मेहफिलीचे कारण केवळ त्याचे परत येणं नव्हते, तो परत आल्याला तसा एक आठवडा होऊन गेला होता गेले दोन तीन दिवस आमच्या त्या शहरी घरात बरीच गरम बातचीत झाली होती. बाबूने पुढे काय करायचे या संबंधीची बहेस होती. सदा तुरुंगात जाण्याकरता काही परमेश्वराने त्याला वतनदाराच्या घरात जन्माला घातले नव्हते. दीड वर्ष तुरुंगात गेल्याने पुन्हा शिक्षणात अर्थ नाही असे बाबूसही वाटत होते, परंतु पुढे करावयाचं काय ?

—' लग्न ' असे उत्तर सगळ्या वडिलधाऱ्यांच्या जिव्हेवर होते. कारण बावीस वर्षाचा बाबू तसं पाहिलं तर लग्न व्हायच्या मर्यादेपलिकडे तीन वर्षांनी गेला होता. परंतु कुणीच विषय काढावयास धजावत नव्हता. कारण सत्याग्रहात सामील झालेल्या व राजकारणात भाग घेतलेल्या मुलाला इतर जमीनदार लगेच मुलगी व तीही भरपूर हुंडा देऊन द्यावयास तयार होणे शक्य नव्हते. उलट अशा घराण्याबरोबर सोयरीक करून आपल्यावर सरकारचा रोष ओढवून घेण्याची पाळी यायची असेच भय प्रत्येकाला वाटणे साहजिक होते. सरकारी रोष म्हणजे इनामे आणि बिदागया जाणे आणि मानमरातब कमी होणे. विनासायास प्रतिष्ठा, स्थिरता आणि सौख्य उपभोगित असलेले जमीनदार स्वतःहून असे नुकसान कसे करून घेतील ?

रामचंद्रपंतानी यातून वाट काढली. पर्याय सूचविला. रामचंद्रपंत हेही आमचे

दूरचे मामा लागत. पण विठ्ठल मामाचे हे दुसरे टोक. रामचंद्रपंत अतिशय शिस्तशीर, कष्टाळू, कर्मठ आणि हिशोबी गृहस्थ होते. ते तीन जहागिरदारांचे हिशोबनीस होते. ह्या स्वस्ताईच्या जमान्यात चांदीचा छन् छन् करणारा निदान एक रुपया कमावल्याखेरीज त्यांना झोप यायची नाही. ते उत्तम पैखाकार होते. मोठ्या अधिकाऱ्यांच्या ओळखी ठेवण्यात आणि त्या वाढविण्यात पटाईत होते. पैसे कमावण्यात आणि दूरचे पाहून माणसे जोडण्यात त्यांचा हात कुणी धरू शकला नसता. त्यांच्या व्यवहाराचे अंग सदा जागरूक असायचे. ते आपला मुद्दा कुणालाही पटवून देऊ शकत. कारण त्या त्या माणसाच्या बौद्धिक पातळीवरचा युक्तिवाद त्यांना जमे. शिवाय हे मामा गरीबीतून, अंगमेहनतीने, चिकाटीने, पडखाऊन आणि तडजोड स्वीकारून संसारात चांगले स्थिर झाले होते. आमच्या घरी पेचप्रसंग असला की थोरले बंधू त्यांना पाचारण करत. थोरल्या बंधूंची त्यांच्यावर फार भक्ती आणि मामांचा पण त्यांच्यावर अपार लोभ.

—रामचंद्रपंत आपल्या नेहमीच्या धिम्या पद्धतीने थोरल्या बंधूंना म्हणाले, ' शंकर, बाबूने सरकारी नोकरी करायचं कबूल केल्यास सर्व प्रश्न सुटतील. पुढे काय करायचे ही समस्याच उरणार नाही. हुंडा मिळेल, लग्न होईल, इज्जत बचावेल — वाढेल आणि घराचा गाडा नीट रूळावर यावयास त्याने फार मोठी मदत होईल, ' अगदी बरोबर मामा. तुम्ही म्हणता ते शंभर टक्के खरे. पण बाबूचे मन तुम्हीच वळवू शकता— तेवढे एक केल्यास — परंतु मामा त्याला सरकारी नोकरी कशी मिळेल. '

' त्याची चिंता नको. कारण तू ज्या जहागिरदारांच्या बरोबर सियासत करत आहेस त्यांचे सरकारदरबारीपण उत्तम वजन आहे. एकदा बाबूनं सरकारी नोकरी करण्याचं मान्य केलं की पुढचं कसं करायचं ते तुला सांगेन. '

—आणि खरेच रामचंद्रपंतांनी बाबूचे मन वळवण्यात यश संपादन केले. बाबू लग्नाला अधीर आहे हे हेरल्याबरोबर त्यांनी आपला सर्व हल्ला कौशल्याने या वर्मावर बोट ठेवूनच केला. त्याला त्यांनी असेही सांगितले की, पुढे वाटल्यास नोकरी सोडावयास त्याचा हात कुणी धरू शकणार नाही. तो आताप्रमाणे त्या वेळेसही आझाद असेल. जगवात बाजूला ठेवून दूर अन्देशीनं पाऊल उचलल्यास ज्या कोंडीत तो आणि सगळे देशपांडे कुल सापडले होते त्यातून फलप्रद सुटका होणार होती. स्वार्थ-परमार्थ साधणार होता. रक्ताची नाती सांधणार होती. लौकिकाची परंपरा सर्वांचं माथं वर करणार होती. हे सगळं एकट्या बाबूच्या निर्णयानं होणार होतं. बाबूच्या अहंकारावर ही हळूवार फुंकर होती. त्याला आणखीन महत्त्व प्राप्त झालं आणि त्यानं शहाणपणानं वागल्याचं श्रेय तडकाफडकी ' होकार ' देऊन मिळवलं.

—त्यानंतर शंकररावना उसंत नव्हती. त्यांनी जहागिरदारसाहेबांच्याकडे चकरा

सुरू केल्या. त्याचा फायदाही झाला. एका सरकारी खात्यात जिथे तकलीफ होणार नाही अशी नोकरी बाबूकरता मुक्रर झाली. सर्वांना परम संतोष झाला. खानदानी मुलगा एकदाचा मार्गाला लागला याची निश्चिती आली.

—हे सर्व जाहीररित्या कळलं तर बाबूच्या लग्नाची वाट सुकर आणि सुफलदायी ठरणार होती. मैफिलीचा घाट या करता घालण्यात आला होता. सर्व नातेवाईकांना, मोठ्या अधिकाऱ्यांना, आप्तांच्या जहागिरदार जमिनदार मित्रांना आमंत्रणे पाठवण्यात आली होती. बाबूला मात्र पूर्णपणे भासविण्यात आलं की, त्याच्या जिंदगीचे एक महत्त्वाचे पर्व संपून त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे पर्व सुरू होणार म्हणून हा जल्लोष होता. हे बेमालूमपणे वठावे म्हणून एक तवायफ अशी निवडण्याची तजवीज केली होती. की तिनं नाचता नाचता शेवटी 'वंदे मातरम' म्हणावं. तशी एकच तवायफ होती आणि तिच आढेवेढे घेत होती. तिच्याखेरीज मैफिलीची बाबूच्या दृष्टीनं परिपूर्णता होणार नव्हती. राष्ट्रीय लढ्यात सहभागी झालेल्या विराचे स्वागत यथोचित व्हावे असा योजकांचा त्यांच्याप्रमाणे एकंदर आराखडा होता. विठ्ठल मामानी म्हणूनच अब्दुल्लाला कसंही करून तिने किती पैसे मागितले तरी तिला घेऊन ये असं फर्मावलं....

[ क्रमशः ]

---

जेम्स हेडले चेस, इयान फ्लेमिंग, ॲलिस्टेअर मॅक्लीन, अर्ल स्टॅनले डिनर आणि जॉन क्रिसे हे रहस्यमय व सनसनाटी कथा लिहिणारे लेखक सध्या अहमदाबादेत भलते लोकप्रिय झाले आहेत. त्यांची पुस्तके मुळातून किती वाचली जातात कोणास ठाऊक; पण त्यांची गुजराती भाषांतरे धमाल खपताहेत. यातल्या प्रत्येक पुस्तकाच्या पाच हजारावर प्रती हातोहात उडाल्या आहेत.

एक वेळ अशी होती की अशा पुस्तकांचे भाषांतर करताना भारतीय वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न व्हायचा. जेम्स बाँड पोपटलाल म्हणून अवतारायचा! वाचकांना काही ते पसंत पडले नाही. म्हणून लेखकांनीसुद्धा सरळ भाषांतर करायचा धोपटमार्ग स्वीकारला आहे.

या भाषांतरांचे बाह्य रूप अत्यंत भडक असते. अनावृत्त ललनांची किंवा पोलादी देहाच्या पुरुषांची रंगीत चित्रे मुखपृष्ठावर असतात. किंमत माफक असते. या पुस्तकांचे आकर्षण तरुण वर्गाला विशेष आहे.

---

## मध्यंतर

# राष्ट्रीय संगीत नाट्य केन्द्राचे त्रैमासिक

पुष्पा भावे

कोणत्याही सुसंस्कृत समाजात कलाजीवनाचे असे एखादे–National Centre For Performing Arts सारखे सजीव केन्द्र असणे अत्यावश्यक असते. कला व्यवहाराची प्रकृतीच अशी आहे की ज्यामुळे अशा कलाकेंद्राने केवळ प्रशासकीय भूमिका घेतल्यास त्याचे अस्तित्व उपचारापुरते राहते. भारतातील विविध प्रांतातील, विविधभाषिक कलांशी (प्रयोग प्रवण कलांशी) संपर्क राखणे आणि भारतीय परंपरा डोळसपणे जतन करतानाच नव्या प्रयोगाला प्रोत्साहन देणे हे कार्य अत्यंत गुंतागुंतीचे आणि अवघड आहे. या कार्याचा प्रारंभ कसा झाला आहे–आज ते कार्य कसे चालू आहे याविषयीचे सर्वसामान्य रसिकांचे–संगीतनाटचव्यवहाराच्या संबंधितांचे कुतूहल लक्षात घेऊनच या केंद्राने त्रैमासिक सुरू केले आहे. या त्रैमासिकाच्या पहिल्या खंडाचे दोन अंक आज माझ्यासमोर आहेत.

पहिल्या अंकाच्या मुखपृष्ठावर केंद्रातील ध्वनिमुद्रिका ऐकण्याच्या खास कक्षेचे छायाचित्र आहे. या कक्षेच्यावरच किसनगड चित्राचा नमुना दिसतो. भारतीय परंपरा आणि आधुनिक सुविधा यांचा कार्यक्षम मेळ आपल्याला केंद्राच्या इमारतीतच नाही तर त्यांच्या त्रैमासिक पत्रिकेतही दिसतो. पहिल्या अंकात अल्लादियांखाँचे घराणे आणि आधुनिक सुविधा यांचा केसरबाई केरकर, विष्णू दिगंबर पलुस्कर, उस्ताद अल्लाउद्दीन खाँ या गायनवादनक्षेत्रातील महर्षींवरील लेख आहेत. त्याबरोबरच डॉ. सुरेश अवस्थींचा भारतातील व आशियातील रामायणावर आधारित नाटचप्रयोगांविषयीचा अभ्यासपूर्ण लेख आहे. संगीतनाटच परंपरेचा अभ्यास करणाऱ्या या लेखांबरोबरच 'A New Theory of consonance' हा रामण्णा यांचा लेख शास्त्रशुद्ध पद्धतीने ध्वनीचे विश्लेषण करणारा आहे. अशाप्रकारची विविध ज्ञानशाखांच्या तर्कशास्त्राची देवाणघेवाण आपल्याकडील विचारात इतकी कमी होते की त्यामुळे या मासिकाने सुरू केलेला हा उपक्रम स्वागतार्ह वाटतो. संगीतनाटचावरील पुस्तकांचे नव्या ध्वनिमुद्रिकांचे परीक्षण करणारा विभागही या नियतकालिकाला आवश्यक असाच आहे. या

त्रैमासिकाचा पहिला अंक वाचल्यानंतर चटकन जाणवते की आजच्या रंगभूमी-वरील वा आजच्या संगीतक्षेत्रातील घडामोडीपासून हे मुखपत्र फार अलिप्त आहे. राष्ट्रीय संगीत नाटयकेंद्र हे सजीव केंद्र राहावयाचे असेल तर त्यांनी आजच्या आविष्कारांशी जवळकीचे नाते सांधले पाहिजे असा विचार मनात येतो. या त्रैमासिकाचा दुसरा अंक पाहिल्यावर प्रत्यक्ष संपादकांनाच हे जाणवले असावे याचा आपल्याला प्रत्यय येतो.

दुसऱ्या अंकातील पहिलाच लेख 'The Legacy of Rajasthan' हा आहे. राजस्थानच्या लोकपरंपरे-विषयी लिहिताना कोमल कोठारी यांनी केवळ इतिहास कथन न करता मणी कौल यांच्या दिग्दर्शनाखाली पंधरा मिनिटांची फिल्म करताना आलेले अनुभव, वेगवेगळया संगीत थाटातील अंतर स्पष्ट केले आहे 'Censorship And Sakharam Binder' हा अशोक देसाईंचा लेख 'सखाराम' प्रश्नाची न्यायालयीन बाजू रंगविणारा असला तरी त्यात लेखकाचे वाङ्मयीन भान प्रतिबिंबित झाले आहे. 'Cinema, Television and Education' हा श्याम बेनेगल यांचा लेख चित्रवाणीमाध्यमाचा शिक्षणशास्त्राच्या दृष्टीकोनातून विचार करणारा आहे. भारतासारख्या देशात चित्रवाणीवर होणारा शासकीय खर्च या दृष्टीकोना-नेच सफल होणार आहे.

याच अंकात कमलेश्वर यांचा मोहन-राकेश वरचा भाषांतरित लेख आहे. हा लख केवळ पुस्तकी समीक्षणाच्या स्वरूपाचा नाही. कमलेश्वर–राकेश यांच्या स्नेहातून निर्माण झालेली एका आगळया व्यक्तिमत्त्वाची जाणकारी त्यात व्यक्त झाली आहे. तर 'An Indian Playwright In New York' या भाषांतरित लेखात विजय तेंडुल-करांसारख्या एका प्रयोगशील नाटक-काराच्या, अमेरिकेतील दोन नाटय-प्रयोगाविषयीच्या प्रतिक्रिया झाल्या आहेत. दुसऱ्या अंकाचे हे स्वरूप आजच्या संगीतनाटयसृष्टीशी संपर्क राखणारे म्हणून मला अधिक श्रेयस्कर वाटते.

राष्ट्रीय संगीत नाटयकेंद्राचे त्रैमासिक हे कोणत्याही इतर संस्थेच्या House-Journal सारखे असून चाल-णार नाही. केंद्राची, त्याने चालविलेल्या उपक्रमांची, माहिती देणे हा या त्रैमासिकाचा प्रधान हेतु नाही. प्रयोग-प्रवण कलांच्या माध्यमाचा, त्यातील प्रयोगांचा तात्विक विश्लेषक अभ्यास, भारतीय कलापरंपरांचे पुनर्मूल्यमापन करीत असतानाच वर्तमानकाळाशी डोळस व शोधक संपर्क ठेवण्याचे कार्य, या त्रैमासिकाला करावे लागेल. कला-विषयक नियतकालिकांची भारतातील स्थिती पाहता या त्रैमासिकावर फार मोठी जबाबदारी आहे. श्री. नारायण मेनन, सौ. कुमुद मेहता यांच्यासारखे विवेचक रसिक संपादनात याकडे लक्ष देतीलच. परंतु त्याबरोबर संगीतनाटय-क्षेत्रातील कलावंतांनी, विचारवंतांनी हे

आपले व्यासपीठ मानून यानिमित्ताने कलाविषयक गंभीर विचार मांडला पाहिजे हेही तितकेच खरे.

या त्रैमासिकाचे मुखपृष्ठ व कागद उत्तम प्रतिचा असूनही छापील जागेची मांडणी फारशी वेधक नाही. केंद्राचा परिसर रम्य असण्याची गरज आग्रहाने प्रतिपादन करणाऱ्या अधिकारी व्यक्तींनी मासिकाच्या या बाह्यरूपाकडे अधिक लक्ष पुरवायला हरकत नसावी. ●

# चंद्रलेखाचा विदूषक

वि. वा. शिरवाडकर हे कालच्या युगात 'कुसुमाग्रज' म्हणून प्रसिद्ध असले तरी गेल्या काही वर्षात नाटककार शिरवाडकर म्हणूनच ते अधिक लोकप्रिय झाले आहेत. याचा अर्थ गेल्या काही वर्षातच त्यांनी नाट्यलेखन केले असे मात्र नाही. 'मुंबई मराठी साहित्य संघा'ने ऐन उमेदीच्या काळात शिरवाडकरांची 'कौंतेय', 'वैजयंती', 'दुसरा पेशवा' ही नाटके रंगभूमीवर आणली; ताकदीच्या कलावंतांनी त्यात भूमिका केल्या; परंतु ही नाटके फारशी लोकप्रिय झाली नाहीत. मात्र विशिष्ट वाङ्मयीन वर्तुळांमध्ये शिरवाडकरांच्या नाट्यसंहितांविषयी स्वारस्य असणारा एक वर्ग निर्माण झाला. शिरवाडकरांच्या नाटकाच्या निमित्ताने, त्यांची नाटके वाङ्मयीनदृष्टचा मोठी आहेत; कदाचित प्रयोगदृष्टचा ती कच्ची असतील; असा बुद्धिभेद करणारा युक्तिवादही केला जाऊ लागला. शिरवाडकरांच्या काव्यमय भाषेला भुललेला वाचकांचा वर्ग त्यांच्या नाटकालाही काव्यमय नाटके म्हणू लागला. ज्या काळामध्ये शिरवाडकरांची वर उल्लेखिलेली नाटके मान्यता पावली त्या काळात त्या नाटकांच्या तुलनेला मागील काळातील अत्रे–वरेरकर–रांगणेकर यांची गद्य कथासंकल्पना, ढोबळ संघर्ष असणारी नाट्यमयता होती हे अर्थातच विसरून चालणार नाही. त्या नाटककारांच्या तुलनेने शिरवाडकरांच्या मूलभूत संकल्पना अधिक गंभीर व गहिऱ्या होत्या यात संशय नाही. परंतु कल्पना गंभीर असणे आणि संपूर्ण नाटक काव्यमय Poetic Drama च्या स्वरूपाचे असणे यात अंतर असते. तसेच शिरवाडकरांच्या नाटकातील काही व्यक्तिमत्त्वे आणि काही स्वगते वजा करता मराठी भावविवश नाटकाची चौकट त्यांनी बदलली असेही म्हणता येत नाही.

शिरवाडकरांचे चिंतनशील व्यक्तिमत्त्व, चमकदार कल्पना, सुभाषिते यातून व्यक्त झाले; पण आयेनेस्को, बेकेट यांच्याप्रमाणे त्यांच्या चिंतनाने स्वतःचा नाट्याविष्कार कधी शोधला नाही. शिरवाडकरांचा सामाजिक विचारही त्यांच्या नाट्यसंकल्पनेतून व्यक्त न होता एखाद्या दुय्यम पात्राच्या आधारे व्यक्त होत राहिला. शिरवाड-

करांच्या नाटकांच्या तिसऱ्या अंकांचे विश्लेषण केले तर त्यांच्या नाटच-विषयक जाणीवांचा कच्चेपणाही उघड होतो. 'आमचं नाव बाबूराव' या उपहासिकेनंतरची शिरवाडकरांची तिन्ही नाटके गाजली. 'ययाति आणि देवयानी,' 'वीज म्हणाली धरतीला,' 'नटसम्राट' या तीन नाटकांच्या व्यावसायिक यशामुळे, शिरवाडकरांनी वाङ्मयीन यश आणि प्रयोगक्षमता यातील तोल साधला, असेही नाटच-वर्तुळात बोलले जाऊ लागले. खरे म्हणजे शिरवाडकरांच्या वाङ्मयीन व लौकिक व्यक्तिमत्त्वाविषयीचा आदर आपल्या चिकित्सेच्या आड येऊ न देता नाटककार म्हणून शिरवाडकरांचे यथा-योग्य मूल्यमापन होणे अत्यावश्यक आहे. कारण त्या मूल्यमापनातून मराठी नाटचाभिरुचीचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे–आजचे मराठी नाटक खरोखरच 'आजचे' आहे का हेही निश्चित होणार आहे. परंतु अशा विश्लेषणाचे हे स्थळ नाही. नुकतेच शिरवाडकरांचे 'विदूषक' थाटामाटाने रंगमंचावर आले–त्या नाटकाच्या प्रयोगाला जात असता जे विचार मनात आले तेच वर प्रगट केले आहेत.

चार्ली चॅप्लीनचे बोलपट–मूकपट हे नाटचाचा एक आगळा आविष्कार घडवितात. विशेषत: कारुण्य आणि हास्य यांच्या सीमारेषेवरील अनुभव व्यक्त करण्याचे चॅप्लीनचे कौशल्य विसाव्या शतकातील प्रेक्षक अनुभवाचा लक्षणीय भाग आहे. शिरवाडकरांनी चॅप्लीनच्या 'City Lights' या गाजलेल्या चित्रपटाच्या आधारे 'विदूषक' हे नाटक लिहिले आहे. यापूर्वीच शिरवाडकरांनी 'ययाति आणि देवयानी' या नाटकातील विदूषकाचे सांकेतिक संस्कृत स्वरूप बदलून त्याला वस्तुस्थितीची जाणीव असणाऱ्या, सामान्यांच्या जीवनाशी दुवा असणाऱ्या तत्त्वज्ञाचे रूप दिले होते. त्यांच्या 'कौंतेय' नाटकातील कर्णाचा सेवक जांधील, हाही काहीसा वरील भूमिके-जवळ जाणारा आहे. 'विदूषक' नाटकातील बगाराम मोठ्या डोळ्यांचा, छोटचा मिशांचा, बावळट स्वभावाचा आहे. चॅप्लीनचे स्मरण होईल असे त्याचे वर्णन शिरवाडकरांनी केले आहे. एका बारमध्ये सेवक असणारा हा बगाराम आणि एका प्रचंड उद्योगयंत्रणेचे स्वामी असणारे रायसाहेब यांच्या विचित्र मैत्रीचे सूत्र या नाटकातील प्रमुख सूत्र आहे. तर कुरूप बगाराम आणि एक सुंदर अंध तरुणी यांचे नाते हे या नाटचानुभवातील दुसरे महत्त्वाचे सूत्र आहे. बगारामसारखा घर, कुटुंब, निश्चित नोकरी अशाप्रकारचे कोणतेही बंध नसणारा मनुष्य आणि रायसाहेबां-सारखा सारे असूनही रात्री मद्याच्या नशेत मुक्त होणारा मनुष्य समोरासमोर आणून त्यातून सुखाची साधने गोळा करता करता उपाशी, एकाकी राहिलेला आजचा मानव शिरवाडकरांना उभा करावयाचा असावा. परंतु रायसाहेब व बगाराम यांचे नाते प्रत्यक्ष नाटकात इतक्या उथळ पातळीवर रंगवले गेले

आहे की त्यातून फक्त मराठी मध्यमवर्गीय माणसाचा श्रीमंतीविषयीचा आणि श्रीमंतांविषयीचा आकस सुखावतो. 'श्रीमंतीचा उंदीर काळीज कुरतडतो' इत्यादी कल्पनांना प्रेक्षक टाळ्या देतात; पण यापलीकडे नाटकाच्या संपूर्ण आकारात रायसाहेब व बगाराम यांच्या संबंधांतून फार काही साध्य होत नाही. रायसाहेबांच्या तोंडी योजलेली राजकीय उपहासके ही तर प्रस्तुत नाट्यस्वरूपात न बसणारी अशीच आहेत.

तमाशाशैलीत दादा कोंडकेंनी लोकप्रिय केलेले प्रचलिताचे संदर्भ 'विदूषक'मध्ये केवळ लोकानुरंजनासाठी आले आहेत. रायसाहेबांचे आचार्यांच्या आश्रमात जाणे आणि त्यायोगे प्रचलित अध्यात्ममार्गांवर शरसंधान करणे, हा नाटककाराला झालेला मोह नाटक विस्कळित करावयास कारणीभूत झाला आहे. या नाटकाच्या संवादभाषेत तर अशा सुलभ मोहासाठी "झाडावरून पडावे जसे फूल--आईच्या कडेवरून जसे मूल" असे अर्थहीन प्रासही नाटककाराने योजले आहेत.

विदूषकाच्या तरल भावनांची होणारी चेष्टा आजवर अनेक थोर साहित्यकृतीत व्यक्त झालेला करूण अनुभव शिरवाडकरांनी दुसऱ्या सूत्राच्या आधारे म्हणजे बगाराम आणि अंध तरुणी यांच्या नात्यातून व्यक्त करण्याचा यत्न केला आहे. तोही अपयशी ठरला आहे. त्या तरुणीच्या शस्त्रक्रियेसाठी बगारामने पुतळ्याच्या जागी उभे राहणे, त्यानिमित्ताने जिल्ह्याच्या ठिकाणच्या सभांचे व्यंगचित्र उभे करणे हे सारेच नाटकाच्या मूळ हेतूशी सुसंगत नाही. मूळ नाट्यसंहिताच अशी स्फुट परिणाम साधणारी असल्यामुळे दामू केंकऱ्यासारख्या कल्पक दिग्दर्शकालाही प्रयोगावर काही विशेष संस्कार करणे शक्य झालेले नाही.

'चंद्रलेखा'ने सादर केलेल्या प्रयोगात 'बगाराम'ची भूमिका गणेश सोळंकी यांनी केली होती. 'चंद्र नभीचा ढळला' या नाटकातील भूमिकेने मुंबईकरांच्या नजरेत भरलेले सोळंकी पुन्हा त्याच स्वरूपातील भूमिकेत दिसतील अशा आशेने आलेल्या प्रेक्षकांची सोळंकीनी निराशा केली. वाक्ये तिरकस फेकण्याच्या लकबीमुळे बगारामचे सहज शहाणपणाचे बोल व्यासपीठावरून फेकलेल्या सुभाषितांसारखे वाटत होते. बगारामचा भाबडेपणाही ते मुद्राभिनयातून प्रगट करू शकले नाहीत. दत्ता भट या नटाने रायसाहेबांच्या स्वरूपाच्या अनेक भूमिका केल्या आहेत. अशा 'हुकुमशहा' छापाच्या भूमिकांमध्ये लावला जातो त्यापेक्षा संमत सूर भटांनी शोधला होता. परंतु लेखनातच त्या भूमिकेला फारशी दिशा नसल्यामुळे भटांना अभिनयाला फारसा वाव नव्हता. आशालता बावगावकर यांची अंजलीच्या भूमिकेसाठी झालेली निवड मुळातच अप्रस्तुत होती. त्यांनी समजुतीने ती उभी केली हे खरे असले तरी रंगमंचावर उभे राहणाऱ्या कोणाही व्यक्तीला आपल्या देहयष्टीची काळजी घेण्याची

नैतिक जबाबदारी कशी वाटत नाही हेच कळत नाही. आशालताबाईंचे गाणे हा तर मोठा विनोद होता. दुसऱ्या तिसऱ्या रांगेपलीकडे त्यांची गाणी ऐकू जात नव्हती. मुळात केवळ एखादे पात्र गायनाच्या व्यवसायातले आहे असे दर्शवून नाटकातील संगीताचे समर्थन होत नाही. 'विदूषक 'मध्ये संगीत अधिक भावगीतात्मक, संपूर्ण नाट्यानुभवाला लय देणारे असते तरच समर्थनीय झाले असते.

आशालताबाईंच्या निवडीत दिसणारा अप्रयोजकपणा या नाटकाच्या अनेक लहानमोठ्या तपशीलातही दिसत होता. रघुवीर तळाशिलकरांचे नेपथ्य प्रेक्षकांच्या व रंगमंचाच्या कोनाचा विचार न करता उभे केलेले होते. त्यामुळे अनेक प्रवेशात पात्रांच्या चेहऱ्याची केवळ तिरपी बाजू दिसत होती. जवाहरबागेचा रंगवलेला पडदा जुन्या संगीत नाटकासारखा कृत्रिम होता. अंजलीची झोपडी व नाग यांच्या मागची भिंत नीट जुळायला तिसरा अंक उजाडला. अनेक प्रवेशात नेपथ्याचे वेगवेगळे भाग नीट जुळत नव्हते. या नाटकातले एक पात्र आंधळे आहे, ते हाताने दार चाचपडणार आहे हे माहीत असताना झोपडीचा Cutout प्रत्येकवेळी डुगडुग हलेल इतका हलका का ठेवला होता? आज कोणत्याही व्यावसायिक वा हौशी रंगमंचावर दिसणार नाही इतका हा सफाईचा अभाव 'चंद्रलेखा'-कृत प्रयोगात का असावा याचा उलगडा झाला नाही. या नाटकाचा प्रयोग वीस मिनिटे उशीरा सुरू झाला. अंकाच्या मधले मध्यंतर प्रेक्षकांच्या सहनशक्तीचा अंत पाहणारे होते. सातचा प्रयोग रात्री बाराच्या जरा आधी संपला. ही सारी कथा दुसऱ्या प्रयोगाची आहे. पहिला प्रयोग त्याच दिवशी सकाळी शिवाजीमंदिरात झाला असताना सायंकाळच्या प्रयोगात हे गोंधळ होते. इतकेच नाही तर नंतरच्या प्रयोगांच्या बाबतीतही प्रेक्षकांच्या याच स्वरूपाच्या तक्रारी आहेत. मराठी प्रेक्षक जात्या सहनशील आहे म्हणून निर्मात्यांनी त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहण्याची गरज नाही. ●

## विदूषक : मुक्काम पुणे

शरद गोखले

तो एका अलिशान बारमधील सामान्य नोकर. सर्वसाधारण परिस्थितीमध्ये त्याचे अस्तित्वही फारसे कुणाला जाणवले नसते. पण खोट्या माणसांच्या दुनियेमध्ये, खोट्या व्यवहारी जगामध्ये मश्गूल असलेल्या रावसाहेबांची आणि त्याची गाठ पडते...आणि शिरवाडकर यांचे 'विदूषक' हे नवीन नाटक मार्गी लागते. छोट्या स्वप्नांनाही महाग झालेला एक साधासुधा माणूस, —आणि सायंकाळच्या मद्यपानानंतर अशा माणसावर मोहवणारे रायसाहेब यांची गाठ पडली खरी पण पुढे काय?

पुढे तसे फारसे काही घडत नाही. मद्याने विटली गेलेली रायसाहेबांची दोन रुपे बगारामच्या ध्यानात येतात. अखूड मिशाचा हा बुटका बगाराम बावळट असेल,. पण तो मुर्ख नाही. रायसाहेबही काय चीज आहे हे लक्षात आल्यावर तो चटकन बाजूला सरकतो. रायसाहेबांच्या कचेरीमध्ये ज्यांनी आपली उभी हयात घालवलेली असते,— अशा माणसाचे अपघाती निधन होते. त्यामध्ये होरपळलेली अंजली – आणि हा भोळाभाबडा बगाराम यांची गाठ पडते. बगारामच्या शुष्क जिवनाला काव्य सापडते. अंधळचा अंजलीच्या काळचाकुट्ट जगामध्ये बगाराम जिवनाचे एक सुंदर, लोभस रूप उभे करतो. अंधळी अंजली हरकून जाते.

रायसाहेब आणि बगाराम यांची "स्पेशल पातळी वरील" मैत्री तशीच चालू असते. या मैत्रीमुळे असेल कदाचित पण बगाराम रायसाहेबांकडून अंजलीला मिळू शकणारी रक्कम मिळवितो.

कोणा एका डॉक्टरच्या सल्ल्याप्रमाणे अंधळचा अंजलीला डोळे यायची शक्यात असते. बगारामला हे वृत्त समजते. मोठी अजब क्लुप्ती योजून बगाराम पैशाची नड पूर्ण करतो. अंजलीच्या मनातील नाजूक भावनांना खतपाणी मिळते. बगाराम या नावाने उभी राहणारी प्रतिमा अस्पष्ट होत जाते. अंजलीच्या डोळचासमोर उभा राहतो राजकुमार. या राजकुमाराशो तिचे हितगुज सुरू होते.

योजल्याप्रमाणे शस्त्रक्रिया होते. दुनियेचे सौंदर्य आपल्या राजकुमारामध्ये पाहणारी अंजली, तिच्या स्वप्नीचा हा राजकुमार न आल्याने निराश होते. मनःचक्षु समोर उभ्या असलेल्या राजकुमाराच्या चित्राला तडा जाईल,— अशा बातम्या अंजली पर्यंत पोचतात.

रायसाहेबांच्या मोहब्बतीची चव चाखण्यासाठी राजकुमार – बगाराम तुरुंगाची हवा खाऊन येतात. तरीही अंजली त्याला हवी असते. पण त्याचे बुजरे मन आणि लाजीरवाणे शरीर. छे! कुठे अंजली कुठे आपण – नकोच ते. बगाराम मुका होऊन अंजलीच्या दारी जातो. त्याच्या पत्राने अंजलीचे भावस्वप्न चुरून जाते.

## समजत नाही, पटत नाही

नटसम्राटचे तेजाळलेले यश पाठीशी घेऊन शिरवाडकरांसारखा समर्थ नाटककार नवीन कलाकृती घेऊन येतो, तेव्हा अपेक्षांचे तरंग उठले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सर्वसाधारण प्रेक्षकांच्या या अपेक्षा–शिरवाडकर यांची ही नाटचकृती पूर्ण करू शकत नाही. काव्यात्मक प्रवृत्तीची ही नाटचकृती–एका अपरिचित, तरळ, पातळीवरून वाटचाल करते. ज्या कोणा प्रेक्षकाला नाटककाराच्या मनातील हा सूर सापडतो. त्या प्रेक्षकाला एक कलाकृती पाहिल्याचा आनंद जरूर मिळतो. पण अशा मुठभर प्रेक्षकांखेरीज इतरेजनांचे काय? त्यांना हा विदूषक–समजत नाही पटत नाही. आणि स्पष्टच सांगायचे तर शिरवाडकर यांनी तरी लिखाणामध्ये एक विशिष्ट

पातळी कुठे सांभाळली आहे. विषयाचा पोचही संभाळायचा आणि प्रेक्षकालाही पकडायचा—असा त्यांचा दुहेरी प्रयत्न निदान काही प्रवेशांमधून तरी अत्यंत सुस्पष्टपणे जाणवतो. अन्यथा—पाटलाची व्यक्तिरेखा—आहे असा तोंडावळा घेऊन उभी राहिली नसती आणि विदूषक पुतळा म्हणून उभा राहतो. तो प्रवेशही उंचावला असता. विषयाशी अत्यंत इमान राखणारा भाग म्हणजे मुक्या बगारामाचे बोलके पत्र असलेला अखेरचा भाग. अंजली ते पत्र वाचते आणि बगाराम—कोंडल्या मनाने ते सर्व ऐकतो-पचवतो. विषयाची उत्कटता केवळ याच प्रवेशामध्ये जाणवते. रावसाहेब आश्रमवासी होऊन आल्यानंतरचा वार मधील एक सिन तर चक्क पाप्युलर लेव्हलवर लिहिला गेला आहे. रावसाहेबांचा चिटणीस आणि बगाराम यांच्यामधील दृष्यांची दाद घ्यावी तर त्या लगोलग येणारी—आत्महत्या प्रकरणाची दृष्ये निराशा करतात.

लिखाणापुरते निश्चित स्वरूपाचे बोलायचे झाल्यास विषयाची निवड चांगली असली तरी नाट्य माध्यमाचा वापर व्यवस्थितपणे झालेला नाही. नाटक प्रयोगक्षम असल्याने दृष्यभाग ही महत्त्वाची बाजू. नाटककाराला जे काही सांगायचे आहे ते या दृष्य भागातून पुढे सरकलेच नाही. तर नाटककार भले कितीही मोठा असेल, तरी त्याचा उपयोग काय? प्रसंगांची सुसंबद्ध बांधणी, आणि संवाद यांचे नाते जोपासावे लागते ते जोपासले न गेल्याने दाद घेणारे संवादही कथावस्तूपासून अलग राहतात. लिखाणाची ही फसलेली बैठक प्रेक्षकांना नव्हे तर कलाकरांनाही त्रास देऊन जाते.

चंद्रलेखा या मोहन वाघ यांच्या नाटयसंस्थेने शिरवाडकरांची ही नाटचवस्तू उचलली. दामू केंकरे यांच्या सारखा मर्मज्ञ दिग्दर्शक या कलाकृतीला लाभला. दत्ता भट, गणेश सोळंकी, आशालता— या तोलामोलाच्या कलाकारांनी भूमिका केल्या. हा तपशील नोंदवण्याचे कारण इतकेच की तरीही नाटक प्रेक्षकांपर्यंत पोचू शकले नाही. काही तरी समारोपात्मक असल्याखेरीज आपल्या प्रेक्षकांना नाटक संपले आहे असे वाटत नाही. बगाराम आणि अंजली यांच्यामधील प्रवेश हा असा समारोपात्मक जरूर आहे. पण ज्या पद्धतीने नाटक समारोपाकडे जाते, त्याच्याशी नाते सांगणारा भाग—त्या आधी फारसा घडतच नाही. बगारामची व्यक्तिरेखा ज्या ज्या प्रवेशातून काही निश्चित आकार घेते, त्या प्रवेशांना प्रेक्षक दाद देतात. आणि बगाराम जिथे उगाच रेंगाळतो, किंवा घटनात्मक वेगाच्या दृष्टीनेही प्रयोग जेथे रेंगाळतो तेथे प्रेक्षक कंटाळतो. त्यामुळेच प्रेक्षकाला समजत नाही. ही भूमिकाही घेऊन चालणार नाही. कलाकार म्हणून रावसाहेबांच्या भूमिकेमध्ये वावरणारे दत्ता भट सर्वात प्रभावी वाटतात. नाटक कुणाचे बगारामाचे, का या रावसाहेबांचे, बरे दुधारी म्हणावे तर दोन पात्रातून विषयाला ज्या पद्धतीने

धार चढणे जरूर तशीही ती चढत नाही. मग भटही रेंगाळत, तब्बेतीने काम करतात. तर काही उत्तम सिन्स (उदाहरणार्थ—रावसाहेबांच्या प्रथम भेटीचा, अंजली बरोबरील अखेरचा किंवा रावसाहेबांच्या चिटणीसाबरोबरचा) वगळणे तर सोळंखी आपण—खरोखरच विदूषक आहोत असे दाखवण्याचा प्रयत्न करतात. पुतळ्याचा सिन किंवा जवाहर बागेतील दृष्यातुन त्यांच्याकडून जास्त सखोल अभिव्यक्तिची अपेक्षा आहे.

एखाद्या फर्मास कौटुंबिक नाटकामध्ये रुळलेल्या ताईने जसे काम करावे, तशी काहीशी सुरवात करूनही आशालता बाई नाटकाचा सूर उशीरा का होईना पण पकडतात. त्यामुळेच बगाराम व अंजली यांच्यामधील नंतरच्या दृश्यांना अर्थ प्राप्त होतो.

नाटकाच्या निर्मितीमध्ये चंद्रलेखेने जास्त जाणीवपूर्वक लक्ष घालणे जरूर आहे. नेपथ्याची बाजू—घाईगर्दीने उरका पाडल्यासारखी उभी केली आहे. संपूर्ण प्रयोग पाहिल्यावर एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते—म्हणजे थेट नाटककारापासून ते नेपथ्यकारापर्यंत सर्व मंडळी गोंधळून गेल्याने गोंधळलेल्या मनस्थितीतच बिचारा प्रेक्षकही नाट्यगृह सोडतो. एखादा मोठा चित्रपट पाहिल्यावर काही दृश्ये ज्याप्रमाणे प्रेक्षकांच्या मनासमोर काही काळ तरळत राहतात त्याप्रमाणे शिरवाडकर यांच्या सुडौल संवादांनी नटलेल्या काही सुंदर जागा, एखाद्या कलाकाराने आपल्या ताकदीने उंचावलेला एखादा प्रवेश, यांच्याच पुसटशा स्मृती हे नाटक मागे ठेऊन जाते. नाटकाची पुर्नरचना करून सुमारे तासामध्ये ते आवरेल, अशा पद्धतीने ते प्रायोगिक रंगभूमीवर उभे करण्यात आले तर कदाचित शिरवाडकरांना अभिप्रेत असलेल्या विषयाचा एकत्रित परिणाम प्रेक्षकांपर्यंत पोचू शकेल. ●

# टाइम इज अप्

कलोपासकांची ' जून 'मधील एकांकिका

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासकांच्या 'प्रयोग' या उपक्रमातील जून महिन्यातील एकांकिका दिलीप खांडेकर यांची 'टाइम इज अप्' ही आहे.

हवाई चाचेगिरी करणाऱ्या एका टोळीने तीन लोकांना पकडून ठेवले आहे. काही रकमेची मागणी केलेली आहे. विशिष्ट मुदत दिली आहे. वाटाघाटी—निरोपांचे सत्र सुरू आहे. हाती असलेल्या तिघांना जिवंत मारावे की नाही याबद्दल टोळीमध्ये मतभेद आहेत. एवढ्यात एका लहान मुलीचा आणि टोळीचा संपर्क साधला जातो. ती कोणाचीही ओळख नसताना 'अंकल, माझ्या बाबांना सोडा' असा बालहट्ट धरते. टोळीचा नायक सोडून बाकीचे सारे तिच्याशी सहमत होतात. पकडलेल्या तिघांना मारण्याचा निर्णय नायक घेतो. टोळीतील उरलेले लोक नायका-

च्याच काटा काढतात. आणि आपण शरणागती पत्करतात. एवढ्यातच त्यांनाही गोळ्या घालून ठार केले जाते असे स्थूल स्वरूपाचे एकांकिकेचे कथारूप आहे.

खांडेकरांनी विषय वेगळा आणि नाट्यपूर्ण असा घेतलेला आहे. विषयाचा—घटनेचा जेवढा आवाका आहे, तेवढाच त्याचा ताण ठेवला आहे. अकारण विविध प्रसंगांची भर घालून मूळ घटनेवरचे लक्ष विकेंद्रित केलेले नाही. दुसरी चांगली गोष्ट म्हणजे चाचेगिरी करणाऱ्या, अमानुषवृत्तीने वागणाऱ्या लोकांमध्येही माणुसकीचाही अंश किती खोलवर आहे, त्याचेही दर्शन प्रत्ययकारी आहे. पण ते दर्शन भडक किंवा उथळस्वरूपाचे नाही. तर ते एकांकिकेच्या विस्ताराचा एक भाग म्हणून आलेले आहे. त्याहीपेक्षा एकांकिका लेखनाचा विशेष म्हणजे वास्तवस्वरूपात केलेला शेवट. टोळीतील नायकाव्यतिरिक्त ज्यांनी पकडलेल्या तिघांना जीवदान देण्याचा निर्णय घेतला, त्या टोळीतील लोकांना मात्र त्या मोबदल्यात जीव गमवावा लागला. एक भयाणस्वरूपाचे प्रखर वास्तव, लेखकाने कलात्मकरीतीने प्रकट केल्याने एकांकिकेचा परिणाम चढत्या श्रेणीचा झाला. पण पहिल्या काही मिनिटांच्या संवादातून एकांकिकेचा विषय आणि घडलेल्या घटनेची कल्पना स्पष्ट होत नाही. संवाद म्हटले जात असूनही प्रेक्षकाला त्या गोष्टींचा पुरेसा उलगडा होत नाही. जवळ जवळ संदर्भरहित असलेले हे संवाद उरलेल्या भागाची पूर्वतयारी समर्थपणाने करू शकत नाहीत, हे सतत जाणवते.

पाच पात्रांची ही एकांकिका. यामध्ये कलाकार होते माधव आपटे, सतीस बोडस, मोहन रानडे, धनंजय गोळे आणि अनिल गाडगीळ. या पात्रांना एकांकिकेत नावे नव्हती. हे एका अर्थाने अन्वर्थक होते. कारण अशा स्वरूपाची चाचेगिरी जगातल्या कोणत्याही राष्ट्रात केव्हाही होऊ शकते. अशी माणसे स्थल-काल-धर्म निरपेक्षच गृहीत धरावी लागतात. तशी ती या एकांकिकेत उत्तमपणे प्रस्थापित केली होती. या गोष्टीचा तोटा एवढाच झाला की कोणी कोणते काम केले आहे, हे सहजपणाने समजू शकले नाही. (अर्थात त्यामुळे फार बिघडत नाही.) पाचही पात्रांनी एकांकिकेचे वातावरण आपल्या अभिनयाने आणि हालचालींनी नियंत्रित केले होते. तरतमभावाने सांगावयाचे झाले तर धनंजय गोळे, अनिल गाडगीळ या दोघांचा अभिनयाचा प्रभाव अधिक पडला. त्यामानाने इतरांचा अभिनय कमी वाटला. त्याला दोन गोष्टी कारणीभूत होत्या. एकतर त्या तिघांना एकांकिकेत प्रत्यक्ष शब्द आणि अभिनयाला वाव फारसा नव्हता. आणि जे शब्द होते, ते तितके प्रभावीपणे व्यक्त झाले नाहीत. तरीही ते नकारात्मक नव्हते. किंवा संघभावनेला छेद देणाराही भाग त्यात नव्हता. अनिल गाडगीळ यांनी आपल्या आवाजाचा केलेला वापर लक्षणीय स्वरूपाचा होता. आवश्यकतेनुसार आवाजातील चढउतार विशेष परिणामकारक होता. त्यांना असलेले देह वैशिष्ट्य, आवाजाचे गांभीर्य आणि वजन, अभिनयाची जाण ही अनेक भूमिकांचे आव्हान पेलणारी अशी आहे. (गतवर्षीच्या राज्यस्पर्धेत कलोपासकां-

च्याच 'प्रेषित' नाटकात त्यांनी एका डॉक्टरची (तशी दुय्यम असलेली) केलेली भूमिका स्मरणीय आहे.) एकांकिकेची सुरुवात चढ्या आवाजात अकारण केलेली वाटली. ती एका विशिष्ट आणि आवश्यक त्या पातळीवर, गाडगीळांच्या समतोल आवाजाने आणि शब्दफेकीने आली.

एकांकिकेला नेपथ्य विशेष नव्हते. काळ्या कापडांनी वेष्टित केलेले मोडे फक्त होते. रंगमंचावर प्रत्यक्ष अभिनयाच्या—वावरण्याच्या दृष्टीने जागा फारच मर्यादित असल्याने, हे सर्व मोडे अधिक जवळ ठेवण्यासारखे दिसले. या मर्यादित जागेचा परिणाम पात्रांच्या हालचालींवर झाला. रंगमंचाचा विस्तार जर अधिक असता तर पात्रांना वावरण्यास आणि इष्ट तो परिणाम साधण्यास चांगला उपयोग झाला असता. वाटाघाटींचे—निरोपांचे शब्द दळणवळण जितके स्पष्ट आणि नाट्य विषयाचा भाग कथन करणारे होते, तितका घड्याळाचा आवाज परिणाम करणारा नव्हता. एकांकिकेच्या विषयाला, नावाला घड्याळाची टिक्‌टिक् ही अन्वर्थक होती. पण एकांकिकेत वापरलेला आवाज (जर घड्याळाचा म्हणून असेल तर) परिणामघातक होता. याचे कारण माइकच्या अगदी जवळ मेट्रोनमचा वापर केलेला होता. त्यामुळे तो आवाज टिक्‌टिक् न वाटता एखाद्या (पिठाच्या) गिरणीच्या आवाजासारखा अंगावर आला. मात्र शेवटचे 'फायरिंग' उत्तम टेप केलेले होते. त्याने साधलेला परिणाम एकांकिकेतील शब्दापेक्षाही अधिक काही सांगून गेला. प्रकाश योजना दोन घटनांच्यामधला अंतराचा भाग भरून काढण्यासाठी असल्याने त्यावर वेगळे काही सांगण्यासारखे नाही.

या एकांकिकेचे दिग्दर्शक होते धनंजय गोळे. 'पुरुषोत्तम करंडक' स्पर्धेत यांनी दिग्दर्शित केलेल्या काही एकांकिका मी पहिल्या होत्या. पण त्यापेक्षा 'टाइम इज अप' ही एकांकिका त्यांनी अधिक जाणतेपणाने दिग्दर्शित केली आहे. एकांकिकेचे सूत्र आणि सूर त्यांना नेमकेपणाने कळलेला होता. त्यानुसार त्यांनी पात्रांच्या हालचाली आणि संवाद बसवून घेतलेले होते. मोड्यांचा उपयोग करवून घेऊन पात्रांची निरनिराळ्या दिशेला तोंडे करून बसण्याची पद्धती चांगली होती. नायकाला मारण्याचा प्रसंगही प्रत्यक्ष दाखवून हास्यास्पद केला नाही. पण ज्यावेळी टोळीतील लोकांनी आपले संभाषण दुसऱ्या बाजूला ऐकू गेल्याचा संशय येतो, तेव्हाच्या हालचाली कृत्रिम आणि पोरकट वाटत होत्या. पण अशा काही किरकोळ गोष्टी सोडल्या तर दिग्दर्शक या दृष्टीने गोळे यांनी उत्तम कामगिरी केली यात शंका नाही. त्यांना याच प्रकारची संधी पुन्हा जेव्हा लाभेल तेव्हा याहीपेक्षा अधिक आशयघन—आव्हानात्मक एकांकिकेला ते सामोरे जाऊ शकतील, इतकी आशादायक परिस्थिती या एकांकिकेने निर्माण केली आहे.

कलोपासकांच्या 'प्रयोग' उपक्रमातील ही तिसरी एकांकिका. 'सामना' नंतर 'टायपिस्ट'ने निराशा केली होती. पण 'टाईम इज'ने पुन्हा आशादायक वातावरण निर्माण करून जुलै महिन्यातल्या 'एका मिठीची गोष्ट' या व. पु काळे यांच्या एकांकिकेविषयी अपेक्षा निर्माण केल्या आहेत. त्यांचे दिग्दर्शक आहेत मधुकर जोशी. ● ●

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH-649

# सावरकर सुभाष ग्रंथ भेट

## १ : स्वातंत्र्यवीर सावरकर

लेखक : धनंजय कीर । पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे : ६०० । निवडक छायाचित्रे । किंमत रुपये चाळीस

## २ : मी नेताजींना बघितलंय

लेखक : नारायण सान्याल । अनुवादक : अशोक शहाणे
पृष्ठे सुमारे ३५० । किंमत सुमारे वीस रुपये
'माणूस'मधून गाजलेली लेखमाला मार्च १९७४ मध्ये
पुस्तकरुपाने प्रसिद्ध होत आहे.

---

* १०० रुपयांची ठेव पाच वर्षासाठी 'राजहंस प्रकाशन'कडे ठेवल्यास वरील दोन्ही पुस्तके व्याजाच्या मोबदल्यात विनामूल्य भेट.

---

* सावरकर चरित्र नोंदणीच्या वेळींच दिले जाईल. या पुस्तकाच्या प्रती मर्यादित असल्याने ठराविक नोंदणी होताच ही ठेवयोजना स्थगित होईल.
* ठेवीऐवजी शंभर रुपये पाच वर्षांची 'माणूस'ची वर्गणी म्हणून भरली तरी वरील दोन पुस्तके विनामूल्य दिली जातील.
* पुस्तके पाठविण्याचा टपाल, पॅकिंग इत्यादी खर्च ठेवीदारांकडे आहे.
* पाच वर्षे 'माणूस' वर्गणीचा पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'साप्ताहिक माणूस' या नावे पाठवावेत.
* ठेव पर्याय स्वीकारार्ह वाटला तर शंभर रुपये मनिऑर्डरने किंवा ड्राफ्टने 'राजहंस प्रकाशन' या नावे पाठवावे.
* रक्कम चेकने पाठविणे सोयीचे असल्यास एक रुपया वटणावळ अधिक पाठवावी.

**राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०**

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.